मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)
सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

वर्ष १२
अंक ९

संपादक :
पां. कृ. सावळापूरकर

डिसेंबर १९५७
किंमत आठ आणे

कै. हरि नारायण नेने यांच्या संशोधनात्मक लेखांचे संग्रह
संशोधन लेखसंग्रह, भाग १ व भाग २
त्यांच्या तृतीय स्मृतिदिनीं दिनांक २२-११-१९५७ रोजीं प्रकाशित करण्यांत आले.

विदर्भ साहित्य संघ
अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

जाहीर विनंती ....

संपादकीय ....

गौतम बुद्ध आणि वैदिक धमर् ....

सुप्रसिद्ध नाटककार खासदार मामा वरेरकर यांची त्रीदिवसीय व्याखानमाला ....

संघवार्ता ....

विदर्भ साहित्य संघ : परीक्षांचा निकाल ....

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जाहीर विनंती

विदर्भ साहित्य संघाचें नवीन वर्ष १ एप्रिल ११५७ पासून सुरू होत असून नवीन वर्षाकरिता सभासद-नोंदणी सुरू झाली आहे. वयाचीं २१ वर्षे पूर्ण झालेल्या कोणत्याहि मराठी-भाषाप्रेमी व्यक्तीला सभासद होतां येतें. नव्याने सभासद होणारांना आवेदनपत्र भरून द्यावें लागतें. साधारण सभासदाची वार्षिक वर्गणी फक्त रु. तीन आहे. सभासदांना युगवाणीचे अंक विनामूल्य पाठविण्यांत येतात. सभासदांचे वर्ग पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) **उपकर्ते**—पांच हजार किंवा अधिक रुपये देणारे.
(आ) **आश्रयदाते**—एक हजार किंवा अधिक रुपये देणारे.
(इ) **सहाय्यक**—पांचशें किंवा अधिक रुपये देणारे.
(ई) **हितचिंतक**—अडीचशें किंवा अधिक रुपये देणारे.
(उ) **आजीव सभासद**—पन्नास किंवा अधिक रुपये देणारे.
(ऊ) **साधारण सभासद**—वार्षिक तीन रुपये देणारे.

वर्गणी येण्यास उशीर झाल्यास युगवाणीचे अंक नियमितपणें पाठविण्यांत गैरसोय होते. तरी गैरसोय टाळण्याकरिता नवीन सभासद होऊं इच्छिणारांनी व जुन्या सभासदांनी त्वरित वर्गणी पाठवावी पाठवावी अशी नम्र विनंती आहे. सभासदनोंदणीकरिता ज्यांचेजवळ अधिकृत पावतीपुस्तकें दिलीं आहेत त्या कार्यकर्त्यांचीं नांवें सोबत दिलीं आहेत. त्यांजवळ किंवा कार्यालयांत वर्गणी जमा करून पावती घ्यावी ही विनंती आहे.

दरवर्षी वि. सा. संघाचे सभासद वाढविणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांना व साहित्यप्रेमिकांना त्यांनी ह्या वर्षीहि सभासदनोंदणीला मदत करावी अशी विनंती आहे. ज्या कार्यकर्त्यांना पावतीपुस्तकें हवीं असतील त्यांनी तशी कृपया मागणी करावी.

श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ, नागपूर

वि. सा. सं. चीं अधिकृत पावतीपुस्तकें ज्यांचेजवळ आहेत त्या कार्यकर्त्यांची यादी व पत्ते

अमरावती १ प्रा. मा. ल. व्यवहारे, खापर्डे बगीचा. २ श्री. कृ. व्यं. पेशकार, देवस्थळी यांचा बंगला, अंबापेठ. **हिंगणघाट** : श्री. रा. वि. करपे, लक्ष्मी टॉकीजजवळ. **धामणगांव** : श्री. श्री. पुं. कठाळे. **चांदा** श्री. ज. गो. संत, मधुवन कस्तुरबा मार्ग. **रामटेक** : श्री. कृ. पां मैराळ, श्रीराम विद्यालय. **भंडारा** : श्री. वि. बा. शब्दे, जिल्हा ग्रंथपाल. **किनगांवजहू** : श्री. वि. भ. देशपांडे, वकील. **वणी** : श्री. म. ता. राजूरकर. **खामगांव** श्री. वि. ए. तारे, गो. से महाविद्यालय **गोंदिया** : श्री. बा. का. देशमुख, वकील, सिव्हीललाइन. **वर्धा** : श्री. र. वि. करंदीकर, वकील, महादेवपुरा. **पुसद** : १ श्री. दि. बा. जकाते, २ श्री. भा. श्री. केसकर. **यवतमाळ** : श्री. दि. य. महाजन, वकील. **बुलढाणा** : श्री. मा. ग. डोंगरे, वकील. **वाशीम** : श्री. कृ. भ. देशपांडे, वकील. **नागपूर** : १ श्री. रा. पु. सगदेव, प्रभानिवास जेल रोड; २ श्री. ना. हि. सोनडुले, त्रिवेदी ब्रह्मोसमाज चाळ, उत्तर बझार रोड, ३ श्री. नानासाहेब जोग, गोखले व्हिला, कांग्रेस नगर; ४ श्री. श्री. ग पांढरीपांडे, धंतोली; ५ श्री. य. गो मालोदे, नागजीभाई टाऊन, सीताबर्डी; ६ प्रा. श्री. गो. काशीकर, सुपेकरांचें घर, धरमपेठ; ७ श्री. पां. बा. गडकरी, व्हॉकररोड, सर्कल क्र. ६; ८ श्री. तु. वि. गेडाम,

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक :
पां. कृ. सावळापूरकर

संपादक मंडळ :
कृ. त्र्यं. पेशकार
मा. ल. व्यवहारे
व. कृ. वऱ्हाडपांडे
प्र. दे. कोलते
रा. ना. घाटोळे
भा. श्री. परांजपे
तु. ना. काटकर

वर्ष १२ वें अंक ९

डिसेंबर १९५७

संपादकीय

डॉ० ना. भा. खरे यांचा अमृतमहोत्सव

या प्रांतांतील अखिल भारतीय कीर्तीचे एक पुढारी डॉ. ना. भा. खरे यांच्या वयाला पंचाहत्तर वर्षे पूर्ण झालीं यास्तव त्यांचा अमृतमहोत्सव दि. २७ आक्टोबर रोजीं मोठा निष्ठापूर्वक साजरा करण्यांत आला. डॉ खरे यांचे कोणाचे कितीहि मतभेद असले तरी त्यांची सत्यप्रियता, स्पष्टवक्तेपणा, कर्तृत्वशक्ति आणि धडाडी यावद्दल मात्र कोणाचाहि मतभेद होण्यासारखा नाही. डॉ. खरे यांना दीर्घ आयुरारोग्याचा लाभ होवो व त्यांच्या कर्तृत्वाचा लाभ देशास मिळत राहो अशी 'युगवाणी 'तर्फे आम्ही इच्छा व्यक्त करतों.

कै. ह. ना. नेने यांचे संशोधन लेखसंग्रह, भाग १ व २

श्री. ह. ना. नेने यांच्या मृत्यूस २२ नोव्हेंबर १९५७ रोजीं तीन वर्षे पूर्ण झालीं. (जुनें मध्यप्रदेश संशोधन मंडळ व आता नवीन नामकरणामुळे झालेलें) विदर्भ संशोधन मंडळ आणि विदर्भ साहित्य संघ या दोन सुप्रसिद्ध संस्थांचा व कै. नेने यांचा घनिष्ठ संबंध होता. विदर्भ संशोधन मंडळाच्या प्रारंभापासून ते त्याचे एक कार्यकर्ते होते व मंडळापुढे त्यांनी अनेक संशोधनपर निबंध वाचले होते. विदर्भ साहित्य संघाचे तर ते सरचिटणीस व पुढे अध्यक्षहि होते. त्यांच्या या ऋणांतून अंशतः उतराई व्हावें व त्यांचें योग्य स्मारक करावें या हेतूनें त्यांच्या या तृतीय श्राद्धदिनीं त्यांच्या संशोधनपर लेखांचे दोन भाग क्रमशः विदर्भ संशोधन मंडळ व विदर्भ साहित्य संघ यांनी प्रकाशित केले. हा संयुक्त समारंभ वि. सा. संघाचे एक विश्वस्त लोकनायक बापूजी अणे यांच्या हातून पार पडला. त्याच वेळीं विदर्भ संशोधन मंडळाने कै. नेने यांच्या छायाचित्राचेंहि अनावरण केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कै. नेने यांच्या लेखसंग्रहाचे हे दोन्ही भाग महानुभावीय वाङमयाच्या व प्राचीन मराठीच्या अभ्यासकाला बहुमोल वाटतील याची आम्हांस खात्री आहे. उपरोक्त लेखसंग्रह प्रकाशित करण्याची आर्थिक जबाबदारी यद्यपि वरील संस्थांनी घेतली असली तरी त्यांची शक्ति अति मर्यादित आहे. विशेषेंकरून वि. सा. संघास या बाबतींत आर्थिक साहाय्याची अति निकड आहे. तसें विनंतीपत्रहि संघाच्या अधिकाऱ्यांनी काढलें आहे. तरी ही त्यांची विनंती वाया जाणार नाही अशी आम्हास आशा आहे.

कै. बाबासाहेब देशमुख

चांदा येथील लोकाग्रणी श्री. बळवंत राघव तथा बाबासाहेब देशमुख यांचा १८ नोव्हेंबर रोजीं स्वर्गवास झाला हें सर्वत्र प्रसिद्ध झालेंच आहे. कै. देशमुख टिळकभक्त, उदार, दानशूर, कार्यकर्ते आणि अनेक संस्थांचा आधार होते. वि. सा. संघाचे ते आजीव सभासद असून वि. सा. संघाच्या गोंडवण शाखेस त्यांचा अत्यंत आधार होता. श्री. देशमुख यांच्या निधनाने वि. सा. संघास अत्यंत दुःख झालें आहे. 'युगवाणी' त्यांस आपली श्रद्धांजलि अर्पण करीत आहे.

बऱ्याच पुस्तकांवरील अभिप्राय या अंकांत देण्याचें योजिलें होतें. पण स्थलसंकोचास्तव या अंकांत त्यांना स्थान मिळूं शकलें नाही. त्या सर्व अभिप्रायांचा अंतर्भाव पुढच्या अंकांत करण्यांत येईल.

नियतकालिकांची दिवाळी

खालील नियतकालिकांचे दिवाळी अंक 'युगवाणी'च्या भेटीस आले आहेत. या कृपेस्तव आम्ही या सर्व नियतकालिकांच्या संचालकांचे फार आभारी आहोंत.

अमृत – नाशिक; **उद्यम** – नागपूर; **एकता** – पुणें; **किर्लोस्कर, स्त्री, मनोहर** – किर्लोस्करवाडी; **पुरुषार्थ** – पारडी; **श्रीगुरुदेव** – गुरुकुल मोझरी; **मुलांचें मासिक** – नागपूर; **कल्पना** – पुणें; **चित्रमयजगत्** – पुणें; **नवयुग**- मुंबई; **केसरी** – पुणें; **सत्यकथा** – मुंबई; **सन्मति** –कोल्हापूर; **युगधर्म** (हिंदी) – नागपूर; **सुषमा** – नागपूर; **तरुण भारत** – नागपूर, पुणें; **धनुर्धारी** – मुंबई; **वाङ्मयशोभा** – पुणें; **महाराष्ट्र दीपलक्ष्मी** – नागपूर; **आलमगीर** – मुंबई; **मौज** – मुंबई; **साधना** – पुणें; **दूधसागर**– मुंबई; **शिक्षण मार्गदर्शन** – अमरावती; **विविध वृत्त** – मुंबई.

वरीलपैकी कांही ध्येयवादी नियतकालिकें सोडलीं तर बाकीच्या सर्व अंकांतून ललित साहित्याला प्राधान्य मिळालें असणें स्वाभाविक आहे. या साहित्याचें मूल्यहि फार अल्पकालिक राहणारें आहे हेंहि उघड आहे. या भिन्न भिन्न नियतकालिकांतून चित्रकलेचे अनेक प्रकार व अनेक प्रवृत्ति आढळून येतात. एका प्रख्यात दैनिकाच्या दिवाळी अंकांत स्तनबंधाचे प्रायः सर्व प्रकार चित्राच्या द्वारा प्रदर्शित करण्यांत आले आहेत ! या उलट सोज्ज्वळ अशींहि चित्रें अनेकांनी दिलीं आहेत. सारांश बहुतेक अंक ज्या प्रमाणांत वाचनीय आहेत त्याहून जास्त प्रमाणांत दर्शनीय आहेत. मधून मधून एखाद दुसरा गंभीर लेख मोठ्या संकोचाने बसलेला आढळून येतो. आजच्या रसिक वाचकांचे संतर्पण करील अशीच ही साहित्य संपदा आहे, यांत शंका नाही.

—पां. कृ. सा.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गौतम बुद्ध आणि वैदिक धर्म

ले. अप्रबुद्ध

'जीवनविकासा'च्या सप्टेंबरच्या अंकांत माझे मित्र डॉ. भवानीशंकर नियोगी ह्यांचा 'हिंदुधर्मांत भगवान् बुद्धाचें स्थान' म्हणून एक लेख आला आहे. डॉ. नियोगी यांचा व्यासंग व बुद्धिमत्ता यांच्या लौकिकाला साजेल असाच हा लेख आहे. हिंदुधर्मांत भगवान बुद्धाचें कांही निश्चित असें स्थान आहे, यांत शंका नाही. हल्ली भगवान बुद्ध व बौद्धधर्म यांच्यासंबंधी बरेंच विचारमंथन सुरू झालें आहे. परंतु त्यापासून, हिंदुधर्मानें मान्य केलेला बुद्धाचा मोठेपणा आणि बुद्धाच्या कामगिरीचें खरें स्वरूप ह्यांचा सामान्य जनास अजून व्हावा तसा निश्चित बोध होत नाही. डॉ. नियोगी ह्यांचा लेख, त्या मानानें व्हावा तसा उपकारक होत नाही. ह्याचें कारण असें की, सुबोधता आणि आटोपशीरपणा ह्यांच्याकडे जास्त दृष्टि ठेवल्यामुळे कित्येक गोष्टी विचारांत घेतल्या गेल्या नाहीत. शुद्ध ऐतिहासिक दृष्टीनें विचार करावयाचा म्हणजे त्या गोष्टी लक्षांत घेतल्या पाहिजेत.

ह्या दृष्टीनें विचार करावयाचा म्हणजे पहिली अडचण अशी येते की बौद्ध धर्माची अत्यंत विलक्षण अशीं दोन तीन रूपांतरें झालीं असल्यामुळे, बौद्धधर्म या शब्दानें समजावयाचें काय? बुद्ध सर्वांनाच पूज्य असला तरी त्याचा हीनयान, नागार्जुनाचा महायान आणि असंगाचा वज्रयान हे आचारदृष्ट्या एकमेकांशीं इतके विलक्षण आहेत की, त्यांचा एकमेकांशीं सुसंगत मेळच घालतां येत नाही. बरें, तत्त्वदृष्ट्या विचार करूं म्हटलें तरी तीच अडचण उत्पन्न होते. ह्याचें कारण असें की बौद्ध वाङ्मयाची निर्मिति इतकी विस्कळीत व शेंकडो वर्षांच्या कालावधींत झालेली आहे की पुष्कळ वेळेला, त्यांत खरा बुद्ध कुठे पाहावा, हीच पंचाईत पडते. मॅडम र्‍हीस डेव्हिसनें तर या बाबतीमध्यें जवळ जवळ असें म्हटलें आहे की, खरोखर बुद्धाचे म्हणून कोणते उद्गार असतील तें समजणें जवळ जवळ अशक्यच आहे. ('But our weakness lies partly in our unwillingness to discover to admit that, in every literary composition which has come down to us, we have a history in-little, more especially in such as were for a long time oral, not written and this is the story of all Buddist 'Books' compiled previous to B. C. 100 or even B. C 200. Still it is being said that certain doctrines are certainly fundamental in Buddist teachings of Sixth Century because they happened to be endorsed with an emphasis in books compiled orall ycenturies later and scripturally later still'—The Birth of Indian Psychology-Introduction p. 2, 3)

बौद्ध वाङ्मयाची अशी स्थिति असल्यामुळे, भगवान बुद्ध आणि बौद्धधर्म ह्यांचा शास्त्रीय दृष्टीनें अभ्यास करतांना प्रथम कांही तरी प्रमाणव्यवस्था ठरवावी लागते. हिंदुधर्मासंबंधी अशी प्रमाणव्यवस्था अनादि कालापासून ठरलेली आहे. आजच्या परिस्थितींत, ती जरी कोणाला मान्य नसली तरी समतोल

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बुद्धीने विचार करणाऱ्या कोणासहि एक गोष्ट मान्य करावी लागते. 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' हें वैदिकांचें ध्येय संहितीकरणाच्या पूर्वीच ठरलें होतें, हें तर डॉ. नियोगी ह्यांनाहि मान्य आहे. हींच ध्येयें बुद्ध, महम्मद व येशु ख्रिस्त इत्यादिकांचीं होतीं. परंतु वैदिकांच्या मध्यें आणि त्यांच्यामध्यें एक मोठा फरक दिसून येतो. विश्व म्हटलें की त्यांत अनेक प्रकारचे, निरनिराळ्या अधिकाराचे, भिन्न भिन्न अवस्थांतले आणि वेगवेगळ्या परिस्थितींतले जीव येतात. या सर्वांना खरोखरच कल्याणाच्या मार्गाला लावावयाचें तर तें, एक वाक्य सांगून होणें शक्य नाही. ज्याच्या त्याच्या अधिकारानुरूप त्याला देऊन श्रेयाकडे त्याचें तोंड वळवून द्यावयाचें, म्हणजे 'नदीमुखेनैव समुद्रमाविशत् ।' या रीतींने तो आपोआपच श्रेयाला जाऊन मिळतो, असें धोरण वेदकालापासून तों 'अधिकार तैसा देऊं उपदेश' असें म्हणणाऱ्या काळच्या तुकोबारायापर्यंत एकजात एकसारखें आहे. 'नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।' असें सांगणारी गीता उजळ माथ्याने 'अश्वत्थः सर्ववृक्षाणाम्' असें ईश्वराचें वर्णन करूं शकते तें यामुळेच. समर्थांनी तर आपल्या निर्भीड स्वभावाला अनुसरून, शास्त्रांतील हवींतशीं वचनें घेऊन त्यांची हवी तशी संगति लावणाऱ्यांना असें स्वच्छ सांगितलें आहे की, 'वेदें बोलिला पूर्वपक्ष । मूर्ख तेथेचि लावी लक्ष ॥' ७।६।२७ 'ऐसें कृष्ण कां बोलिला । साधनमार्ग दाखविला । खडे मांडूनि शिकविला । ओनामा जेवी ॥' ६।६।२४

वेदांमध्ये, उपनिषदांमध्ये अथवा तदुपजीवी इतर वाङ्मयांत निरनिराळे प्रकार आढळले, म्हणजे त्यांची संगति अर्वाचीन मनुष्य उत्क्रांति वादाने लावूं पाहतो. उत्क्रांतिवादहि कांही वाईट आहे असें नाही. पण प्रत्यक्षाच्या कक्षेबाहेर असलेली अशी एक गोष्ट पाश्चात्य वेदाभ्यासकांनी प्रचारांत आणलेली ज्या वेळेला वेदवाक्यासारखी प्रमाण मानली जाते, त्या वेळेला तो वाईट होतो. ती गोष्ट ही की, त्या प्राचीन काळीं समाजांत मतमतांतरें असणें केवळ अशक्य होतें. त्यामुळे, जरा कोठे वेगळेपणा आढळला की त्याचें कारण काळाची भिन्नता, वंशभेद, कर्तृभेद, स्थलभेद हेच असले पाहिजेत असें धरलें जातें. या विचारसरणीचा कोतेपणा बार्थने आपल्या पुस्तकांत दाखविला आहे. ('It involves, in our opinion, a mistaken judgment of human nature to be unwilling to admit that dissimilar conceptions may subsist together'—Religions of India–p. 33) इंद्राचें रूपांतर ब्रह्म्यांत होत होतें आणि ब्रह्म्याचेंच पुढे ब्रह्म बनलें इ० कल्पना पाश्चात्य पंडितांच्या अपक्वपांडित्यांतून निघालेल्या आहेत. मी माझ्या पुस्तकांत अन्यत्र दाखविलें आहे की मानवी विचाराची परिणति त्याच क्रमाने झाली असें म्हटलें तरी, ऋग्वेदकालीन मानव हा त्या अवस्थेंतून फार वर आलेला होता.

बौद्ध वाङ्मयामध्ये अशी कांही प्रमाणव्यवस्था प्रथम लावून मग त्याची तुलना इतरांशीं केली पाहिजे. नाही तर कसा प्रसंग येतो पाहा. शिंशिपा सूक्तामध्ये बुद्धाने आपल्या शिष्यांना असें सांगितलें आहे की झाडाला जशीं असंख्य पानें आहेत तसें माझें ज्ञानहि अनंत आहे; हातांतल्या पानाप्रमाणे त्यांतून थोडेसें मी तुम्हांस दिलें आहे.*

त्याचप्रमाणे हिंदुधर्माशीं बौद्धधर्माची तुलना करतांना दोन गोष्टी लक्षांत ठेवल्या पाहिजेत. बौद्धधर्म हें हिंदुधर्माचें अपत्यच असल्यामुळे त्यांचे तोंडवळे सारखे असणारच. त्यांच्या सारखेपणा-

---

* टीप—थोडी विस्मयकारक गोष्ट अशी आहे की सुमारें हजार वर्षें मागाहून महम्मदसाहेबांनीहि तसेंच म्हटलें आहे. I received from the messenger of God, two kinds of knowledge; one of these I taught to others and if I had taught them the other it would have broken their throats—Sayings of Mohammed : no. 155 A. Suravardy. याचा अर्थ असा समजावयाचा काय, की संस्थापकाचें कांही असो, पण संस्था ही कांही मर्यादित ज्ञानावर उभारली आहे !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वरून त्यांची तुलना न करतां वैषम्यावरून तुलना केली पाहिजे. कारण, कांही झालें तरी तो एक फुटून निघालेला पंथ आहे. म्हणून कोठे फूट पडली हें पाहिलें पाहिजे. आणि दुसरी गोष्ट ही की नुसत्या साम्यवैषम्यावरून सिद्धांत न बांधतां प्रत्यक्ष जगांत त्याचा परिणाम काय झाला आहे तें पाहिलें पाहिजे.

ह्याचप्रमाणे आणखी एकदोन गोष्टी ध्यानांत ठेवल्या पाहिजेत. हिंदु लोकांमध्ये श्रीविष्णूच्या प्रमुख अशा दहा अवतारांची कल्पना फार रूढ आहे. आणि सामान्य व्यवहाराच्या भाषेंत त्यांची गणना मत्स्य, कच्छ इत्यादि क्रमाने केली जाते. परंतु तें बरोबर नाही, म्हणूनच त्यावरून जीवाच्या उत्क्रांतीची जी कल्पना केली जाते ती व तिच्या आधाराने बुद्ध हें जीवाचें अत्यंत विकसित स्वरूप आहे, असें डॉ. नियोगींनी म्हटलें आहे, तेंहि बरोबर नाही. सामान्य व्यवहारांत मत्स्यापासून गणना केली जाते याचें कारण असें की, या कल्पाशीं संबंध ठेवणारा परंतु पुरातन कल्पांतला, इतर दहा अवतारांतला आद्य अवतार मत्स्य होय. परंतु उत्क्रांतीचा क्रम जो सांगितला जातो तो पुराणांना धरून नाही. त्या साऱ्याच कल्पना म्हणजे, आमच्याकडील विचार व ज्ञान पाश्चात्यांच्या ऐतिहासिक चौकटींत बसविण्याचा अट्टाहास करण्याची जी सवय आम्हां लोकांस लागली आहे, तिचा परिणाम होय. पौराणिक अनुक्रम असा आहे. मत्स्यावतार प्राचीन कल्पांतला. ज्याला आम्ही चालू कल्प म्हणतों त्यांतील पहिला अवतार वराह हा आहे. त्यानंतर नरसिंह अवतार झाला. नरसिंहानंतर वामन. हिरण्याक्ष, हिरण्यकशिपु, प्रल्हाद, विरोचन, बळी ही सारी मंडळी एका कुटुंबांतली असल्यामुळे, कांही काव्य असलें तरी हकीकत सुसंगत आहे. प्रल्हादाचा नातु बलि याच्या कारकीर्दींत समुद्रमंथन झालें व त्या मंथनाच्या प्रसंगाने कच्छावतार झाला. तेव्हा उत्क्रांति आलीच कोठून ? हीं सर्वच रूपकें आहेत असें म्हटलें म्हणजे तर जीवाच्या उत्क्रांतीची कल्पना सारीच रंजक कल्पना ठरते. पुराणांनीं दशावतारामध्ये बुद्धाला स्थान दिलें आहे त्याचा विचार यथाक्रम पुढे करूं.

तशीच दुसरीहि एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. 'वेदोऽखिलं धर्ममूलम्' अथवा 'प्रमाण्यबुद्धिर्वेदेषु' याचा अर्थ असा केव्हाहि नाही की, धर्मसंबंधी आचार, व्यवहार, प्रायश्चित्त इत्यादि निरनिराळीं महत्त्वाची अंगें आहेत, त्या प्रत्येकाला आधारभूत असलेलें वचन हल्लीच्या कोणत्याहि कायद्याप्रमाणे वेदांत आढळलें पाहिजे. त्याकरितां वेदमूलक स्मृतिग्रंथ स्वतंत्र रचले गेले आहेत, हें सर्वश्रुत आहेच. 'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु' असें जेव्हा लोकमान्य म्हणतात तेव्हा त्याचा अर्थ काय असतो, हें त्यांच्याच सुप्रसिद्ध अशा 'गीतारहस्यांत' आढळून येईल. केव्हाहि काय, मनुष्यांत दोन वर्ग आढळून येतात. एक ज्यांनी प्रत्यक्ष विचार करून आणि अनुभव घेऊन जीवनविषयक दृष्टिकोण तयार केला असतो अशांचा आणि एक ज्यांची येवढी लायकी नसते, म्हणून कोणाच्या तरी अशा दृष्टिकोणावर श्रद्धा ठेवून जे आपल्या आयुष्याची दिशा ठरवितात अशांचा. यावरून उघड होईल की 'सनातनी म्हणविणाऱ्या हिंदूलाहि वेदाची किती माहिती असते' ? अशी कोटी डॉ. नियोगी यांनी केली आहे, ती केवळ पोरकट आहे. कायदा प्रमाण मानतो म्हणणाऱ्या नागरिकाला 'तुला तरी कायदा काय समजतो, म्हणून तूं नागरिक म्हणवितोस' असें म्हणण्यासारखें आहे हें ! मनुष्य जे सारे व्यवहार करतो त्याच्या मुळाशीं कळून अथवा न कळून असा कांही दृष्टिकोण असतोच असतो. आणि त्याचे मूळ त्याची जी बाह्यविश्वाविषयी कल्पना असते तिच्यांत असतें. ही गोष्ट सप्रमाण रीतीने मांडून दाखविणें हीच गीतारहस्याची अपूर्वता आहे. आता तर ही गोष्ट पाश्चात्य विचारवानहि मान्य करूं लागलें आहेत. हल्लीचा एक सुप्रसिद्ध इंग्लिश लेखक हा तर असें ठासून सांगतो की अशी विश्वविषयक कल्पना असल्याखेरीज मनुष्याला जगणें व अशक्य आहे. (It is impossible to live without metaphysics--A. Huxley) तो तर पुढे असेंहि म्हणतो की आपण ज्यांना अजाण समजतो त्यांचा देखील व्यवहार याच पद्धतीनें होतो. (Men live in accordance with their philosophy of life, their conception of the world. This is

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

true even of the most thoughtless ....It is in the light of our beliefs about the ultimate nature of reality that we formulate our conceptions of right and wrong....... So far from being irrelevant, our metaphysical beliefs are the finally determining factors.--Ends and means-A. Huxley)

अशा कांही मूलमूत गोष्टींकडे दुर्लक्ष केल्यामुळे डॉक्टरसाहेबांच्या लेखांत वरीच विसंगति झालेली दिसून येते. उदाहरणार्थ "आजचा हिंदु धर्म पौराणिक आहे. याविषयी वाद नाही" असें त्यांनी म्हटलें आहे तें बरोवर आहे. पण निव्वळ पौराणिक आहे असें म्हणतात तें चूक आहे. विकासवाद वाङ्मयाला व समाजाला लावणाऱ्यांची जी मूळ चूक झाली आहे, तीच येथेंहि झाली आहे. विकासवादाची कल्पना ही उत्क्रांतिवादाचेंच अपत्य आहे. आणि त्या कल्पना अगदी वरोवर आहेत असें म्हटलें, तरी, त्यांच्यांत एक मोठा फरक आहे, तो लक्षांत घ्यावा लागतो. उत्क्रांतिवादाप्रमाणें कोणत्याहि सृष्ट पदार्थाचें रूप उत्क्रांत होऊन एक जाति (species) तयार झाली म्हणजे मूळ जाति वहुधा नष्ट होते. समाजाच्या विकासाचें तसें नाही. उत्क्रांत होऊन नवीन वर्ग वनले तरी पूर्वीचे नष्ट होत नाहीत. ते सारेच एका समाजाच्या आवारांत आपापल्या परीने नांदू शकतात. हल्लीचा धर्म पौराणिक आहे असें म्हटलें तरी तेवढयाने त्याचें वेदमूलत्व नष्ट होत नाही. इतकेंच नाही तर, कोणत्याहि एका काळीं समाज केवळ वैदिक किंवा केवळ पौराणिक होता, असें मानण्यास ऐतिहासिक पुरावा मुळीच नाही. जो कांही आहे तो याच्या उलटच आहे. ही गोष्ट लक्षांत घेऊनच डॉ. केतकरांनी ज्ञानकोशामध्ये वैदिक वाङ्मय आणि सूत वाङमय अशा दोन थरांची कल्पना केली आहे. पाश्चात्य पंडितांनाहि या गोष्टीची कल्पना आली होती. मॅक्समुलर म्हणतो 'Of the religion of the people at large we have no record and never shall have. *But what is true today was probably true in Vaidic times also*' (life and letters of Max Muller--p. 488.) त्या काळचा दुसरा एक लेखक तर असें म्हणतो की 'We shall perhaps find that in this respect also, *the past did not differ so much from present as might at first appear*.'--हा लेखक तर आणखी असेंहि म्हणतो की, 'It involves in our opinion a mistakan judgement of human nature to be unwilling to admit that dissimilar conceptions may subsist together.' (The Religons of India by A. Barth.)

विसंगतीचें एक लहानसेंच उदाहरण पाहावयाचें असेल तर तें पाहा. "यज्ञाच्या द्वारें आपल्या अनेक इच्छा परिपूर्ण करून स्वर्गांत अमरपद मिळविणें हाच यज्ञाचा हेतु होता. देह हाच आत्मा व देहाचें भौतिक सुख हेंच आत्यंतिक, हीच भावना प्रचलित होती." देह हाच आत्मा मानला जात होता तर स्वर्गांत कोण जात होतें? ऋग्वेद काळीं प्रेत जाळण्याची देखील प्रथा होती. यज्ञ करणाऱ्याचें शरीर जर जळून जात होतें! तर स्वर्गांत अमरपद कोणाला मिळत होतें! श्रीसमर्थांनी म्हटल्याप्रमाणे, 'खडे मांडुनि शिकविला साधनमार्ग।' हें लक्षांत न घेतल्यामुळे अशी विसंगति होते.

परंतु, या लेखाचा हेतु, डॉक्टर साहेबांनी हिंदुधर्मासंबंधी काय लिहिलें आहे, तें समजून घेण्याचा नसून भगवान बुद्धासंबंधी काय लिहिलें आहे, हें पाहण्याचा आहे. आणि तेंहि वर सांगितल्याप्रमाणे वेभरवशेशीर अशा वाङ्मयाच्या साह्याने करावयाचें आहे. वौद्ध वाङ्मयाच्या या स्वरूपाची थोडी वहुत कल्पना डॉ. नियोगींनाहि प्रस्तुत लेख लिहितांना असावीशी वाटते. गौतमाने नगरांतून फिरतांना जीं दृश्यें पाहिलीं म्हणून ग्रंथान्तरीं वर्णन आहे, तें सर्व लाक्षणिक आहे असें त्यांनीच म्हटलें आहे. आईवाप

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

रडत असतां त्यांचेसमोर मुंडण करून सिद्धार्थ बाहेर पडला असें बौद्ध वाङ्मयांतच स्पष्ट लिहिलें आहे. या लाक्षणिक वर्णनाला ऐतिहासिक सत्याचें प्रामाण्य दिल्यामुळे पुष्कळ वेळां मोठाच गैरसमज होतो. जयदेवाने गीतगोविंदांत 'निंदसि यज्ञविधेरहः श्रुतिजातम् । सदयहृदयदर्शित पशुघातम् ॥' असें जें म्हटलें आहे तें यामुळेंच. खरें पाहिलें तर अहिंसा हें बौद्धांचें परमतत्त्वहि नव्हे. बुद्धाच्या चार 'आर्यसत्यां'त त्याचा मागमूसहि नाही. आणि जितक्या प्रमाणाने त्याच्या अष्टांगांत त्याचा अंतर्भाव होतो, तितक्या प्रमाणानेच, बुद्धापूर्वीच भगवद्गीतेने त्याचा उच्चारहि केला आहे. परंतु, वैदिक वाङ्मयावरून एकदम पुराणावर उडी मारल्यामुळे डॉक्टर साहेबांच्या ध्यानांतून गीता अजिवातच गळून गेली. अहिंसा हें बुद्धाचें परमतत्त्व नव्हे हें प्रत्यक्ष प्रमाणावरूनच दिसून येतें. खरोखर तें जैनांचें परमतत्त्व आहे व त्याचें ते किती एकनिष्ठेने परिपालन करतात हें प्रसिद्धच आहे. याच्या उलट, अगदी बुद्धापासून तर आजतागायत असा एकहि बौद्ध देश नाही की जेथील लोक पूर्णपणे मांसाहारी नाहीत. मुसलमानाला निदान डुकराचा तरी निषेध आहे. परंतु येथे कसलाच नाही. भगवान बुद्धाने त्याच्या संन्याशांना दिलेली 'प्रवृत्त' मांसरूपी पडल्या फळाची आज्ञा सुप्रसिद्धच आहे. बुद्ध स्वतः डुकराचें मांस खाऊन झालेल्या अतिसाराने निर्वाण पावला असें बुद्ध वाङ्मयच सांगतें. आता ही गोष्ट खरी आहे की, चंडाने वनविलेलें तें सूकरमद्दव म्हणजे एक तीव्र रसायन होतें, अशी बुद्धघोषाने त्याची संपादणी केली आहे. परंतु हा बुद्धघोष, भगवान बुद्धानंतर जवळ जवळ एक हजार वर्षांनी झाला हें लक्षांत ठेवलें पाहिजे. मग जयदेवासारख्यांचा असा गैरसमज कशामुळे झाला? त्यालाहि बुद्धानंतर शेंकडो वर्षांनी झालेला लेखकच कारण आहे. त्याने लिहिलेल्या बुद्धचरित्रांमध्ये, इतर लाक्षणिक गोष्टींबरोबरच, एका यज्ञपशूची दया येऊन त्याच्याऐवजी भगवान बुद्ध स्वतःचा बळी द्यावयास तयार झाला असें काव्य आहे. परंतु तें काव्य आहे हें लक्षांत न ठेवल्यामुळे आणि प्रत्यक्ष बुद्धधर्मीयांचा आचार न पाहिल्यामुळे जयदेवासारख्या सरलहृदय माणसांचे गैरसमज होतात.

प्रस्तुत विषयाशीं प्रत्यक्ष संबंध नसला तरी अशाच एका मोठ्या गैरसमजाचें थोडेसें निराकरण करून मूळ विषयाकडे वळूं. हा समज विशेषतः पाश्चात्य लेखकांनी फार पसरविला आहे. जयदेवाने म्हटल्याप्रमाणे बुद्धाने यज्ञाची निन्दा केली आणि यज्ञपशूकरिता स्वतः बळी जाण्यास तयार झाला हें खरें असलें तरी, त्यावरून, त्या काळीं यज्ञसंस्थेचा अगदी कहर झाला होता असें म्हणणें म्हणजे इतिहास आणि मनुष्य स्वभाव ह्या दोन्हीविषयींहि अज्ञान प्रगट करणें आहे. बुद्धाने अथवा त्याच्यासारख्या इतरांनी यज्ञाविषयी जें म्हटलें आहे, तें, परमश्रेयाच्या दृष्टीने भगवद्गीतेचें अनुकरण करून, 'त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन' या अर्थाने म्हटलें आहे. कारण त्यांना खरी तळमळ आत्यंतिक दुःखनिवृत्तीमुळे प्राप्त होणाऱ्या निर्वाणाची लागली होती. भूतदयेच्या भूमिकेवरून यज्ञसंस्थेची चर्चा केल्याचें उदाहरण बुद्धाच्या उद्‌गारांत एक तरी आढळेल की नाही कोण जाणे!

पाश्चात्यांची कल्पना, इतिहास व मनुष्य स्वभाव ह्या दोघांसहि विरुद्ध आहे. आधी मुळी ही कल्पनाच चुकीची आहे की, ऋग्वेदकालीं प्रत्येक गृहस्थ रोज पशुयज्ञ करीत असे. आजच्या अग्निहोत्रासारखीं त्यांचीं सोमसवनें होतीं व राजे महाराजासारखे समर्थ लोक निमित्ताने अथवा समारंभ म्हणून अग्निष्टोम, अश्वमेध, राजसूय असे याग करीत. टाकलावाजार पांचदहा हजार वर्षांची माहिती सांगतो म्हणणारीं पुराणें जरी धुंडलीं तरी त्यांतहि, राजेमहाराजांनी अथवा इतर कांही समर्थ लोकांनी केलेल्या फार झालें तर हजार पांचशे यज्ञांचे उल्लेख असतील. त्याकाळीं आमजनता मांसाहारी होती, असें तर हे लोकच म्हणतात. नित्य मांसभक्षण करणारांना यज्ञांतील पशुहत्येने अंगावर काटा येण्याचें काय कारण? यच्चयावत् हिंदूंचें परमदैवत असलेल्या लक्षावधि गोमातांचा नित्य संहार होत असतांना गांधींचे परमभक्त असलेल्या राष्ट्रपतींच्या आणि पंतप्रधानांच्या आंगावर कधी काटा आल्याचें ऐकिवांत नाही!

परंतु वर सांगितलेंच आहे की या लेखांत डॉ. नियोगी ह्यांच्या हिंदुधर्माविषयींच्या मतांचा

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विचार करावयाचा नाही. वेदवाङ्मय हा एक विशाल वेदसागर आहे. त्यांतील हवे ते चार विचार घेऊन त्यांनीं आपलें मत मांडलें आहे. दुसरे हवे ते चार विचार घेऊन दुसऱ्या कुणाला अगदी वेगळे सिद्धांतहि मांडून दाखवितां येतील. कांही प्रमाणव्यवस्था नसली म्हणजे विशेषतः भूतकालासंबंधी असें नेहमीच होऊं शकेल. मानवेंद्ररायांनी म्हटल्याप्रमाणे थोडया कुशलतेने बुद्धिमान मनुष्यास हवा तो सत्याभास करतां येतो. 'As regards the past with some ingenuity facts may be fitted into any preconceived theoretical pattern' (New Humanism p. 38.) भगवान वुद्धासंबंधी श्री. नियोगींनी जें लिहिलें आहे, त्यावरून तर या म्हणण्याची सत्यता विशेषच लक्षांत येते. त्याला उपनिषदांची माहिती होती हें म्हणणें बरोबर आहे. परंतु त्यावरून उपनिषदांचें तत्त्वज्ञान त्याला मान्य होतें असें समजणें बरोबर होणार नाही. उपनिषदांतील विचारसरणीचें व त्याच्या विचारांचें वरवर पाहिलें तर निकट साम्य आहे, ही गोष्ट भगवान आचार्यांनी प्रांजळपणें सांगितली आहे. 'यद्यपि बाह्यार्थनिराकरणं ज्ञानमात्रकल्पना चाद्वयवस्तु सामीप्यमुक्तम्' (बुद्धेन) असें त्यांनी मांडुक्यकारिकांवरील भाष्याच्या शेवटीं स्पष्ट म्हटलें आहे व त्याच्याशीं मुख्य भेद कुठे आहे तेंहि सांगितलें आहे. 'ज्ञानज्ञेयज्ञातृभेदरहितं परमार्थतत्त्वं अद्वयमेतन् न बुद्धेन भाषितं । इदं तु परमार्थतत्त्वं अद्वैतं वेदान्तेष्वेव विज्ञेयं'। अशी स्थिति असल्यामुळे दोघांच्या विरोधावरून निर्णय केला पाहिजे, असें मी प्रथम म्हटलें आहे.

आकाशापासून चार महाभूतें निघालीं. या चार महाभूतांपासून सगळें विश्व व मानवी देह उत्पन्न झाला असें म्हणून, सुख व दुःख यासंबंधी त्यांनी हरदासी पद्धतीची कांही कोटी केली आहे. 'ख'च्या अजाताची बाजू 'सुख' व जाताकडील 'दुःख' इ. कोटिक्रमासंबंधी भगवान बुद्धाच्या अथवा इतर बुद्ध वाङ्मयाचा कांहीहि उल्लेख त्यांनी केला नसल्यामुळे त्यासंबंधी तूर्त कांहीहि न लिहितां मुख्य मुद्याकडे वळूं. 'ख' शब्दाचा अर्थ जसा आकाश आहे, त्याप्रमाणेंच, इंद्रिय असाहि होतो. इंद्रियें व्यवस्थित असतात, म्हणजे गीतेच्या शब्दांत 'प्रकृतिस्थ' असतात तेव्हा जी अनुभूति येते व जी कोणत्याहि शब्दांनी व्यक्त करतां येत नाही तिचें नांव 'सुख'; ह्याच्या उलट तें 'दुःख' अशीहि या शब्दांची सहज उपपत्ति लावतां येते. या विश्वरूप कार्यकारण संघातांत बुद्धाच्या मताने आकाशाचें काय कार्य आहे व तोहि 'आत्मनः आकाशः संभूतः।' असेंच म्हणतो, अशाविषयी डॉ. नियोगींनी वकीली कितीहि केली असली तरी त्याला बौद्ध वाङ्मयांतील आधार कोठेहि दिला नाही. बुद्ध वाङ्मयांत 'अनात्म' शब्द हा वारंवार येतो व तेवढयावरून बुद्ध हा अनात्मवादी नव्हता असें सिद्ध होत नाही; कारण आत्मा मानल्याखेरीज 'अनात्म' शब्द येऊंच शकत नाही असा युक्तिवाद करून, त्याकरिता त्यांनी 'अनात्तलक्खण सुत्त' या सूत्राचा आधार दिला आहे. त्यासंबंधी थोडक्यांत एवढेंच म्हणतां येईल की हा युक्तिवाद एखाद्या न्यायमूर्तीशिवाय इतर कोणी केला असता तर जास्त शोभला असता. याचें कारण असें की, या ठिकाणीं 'आत्मा' आणि 'अनात्मा' असें डॉयकाटामीचें वर्गीकरणच अवश्य आहे असें म्हटलें तरी त्यावरून, भगवान बुद्धाचा आत्म्यावरील विश्वास सिद्ध होत नाही. आत्म्यावरील विश्वास बुद्धाच्या फार पूर्वीचा आहे, हें तर डॉक्टरसाहेबहि कबूल करतील. तो विश्वास खोडून टाकण्याकरिताच हें सूत्र आहे. प्रो जेम्सच्या सायकालॉजींत ज्याप्रमाणें असें आत्मतत्त्व स्वतंत्र मानण्याची गरज नाही, विचारच विचारांची जाणीव घेतात (Thought themselves are the thinkers.) असें प्रतिपादतांना, आत्म शब्द पुन्हा पुन्हा येतो, त्याप्रमाणेंच हें आहे. परंतु त्याचा अर्थ प्रोफेसराचा आत्मतत्त्वावर विश्वास होता असें कोणी मानीत नाही. केवळ जडवादी मार्क्सवाद्यांच्या लेखांतहि अशा अर्थाचे शब्द येतात व त्याचा अर्थ आत्मतत्त्वावर त्यांचा विश्वास आहे असा करणें तर्कशुद्ध होईल काय? डॉ. साहेबांच्या म्हणण्याप्रमाणे 'ख' हा विचारमध्य घेतला तर 'पंचस्कंध' हे त्याच्या अलीकडे राहतात व 'आत्मा' त्याच्या पलीकडे राहतो.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्या दृष्टीने उपनिषदांनी पंचस्कंधांना 'नेति नेति' म्हटलें असलें तर तें ठीकच आहे. कारण, त्यांच्या पलीकडे 'आत्मा' आहे असें त्यांना प्रतिपादावयाचें आहे. 'अनात्म' शब्द जर 'नेति' 'नेती'चा पर्याय धरला तर, या पंचस्कंधापलीकडे आत्मतत्त्व आहे असें भगवान बुद्धाचें स्पष्ट वचन एकहि कां नाही! वस्तुस्थिति अशी आहे की, त्याचा स्वतःचा अनुभव काय असेल तो असो, स्वतः बुद्धानें कांहीहि कुठे स्पष्ट सांगितलें नाही. हा प्रश्न त्यानें नेहमीच कांही तरी करून उडवून लावला आहे. 'It should be noted that Buddha himself refused to decide the question whether Nirvan is complete extinction or an unending state of unconscions bliss'. Sanskrit Literature by A. Macdonnel. इतकेंच नाही तर तो पंचस्कंधाच्या ढोबळ वर्गीकरणापलीकडे मनासंबंधीहि जास्त खोलांत शिरला नाही. 'मन', 'चित्त', 'विज्ञान' हे शब्द त्याच्या बोलण्यांत समानार्थक येतात ते त्यामुळेच. तेवढ्याचकरितां रीस डेव्हिसने म्हटलें आहे. 'But speculation concerning nature of mind is not a Buddhist characteristic'. There was of course this deep cleevage between it and the eucharistic consiousness, that the self was banished, and no sense of union with the divin One, aimed at or felt. Here in too the Buddhist differs from the Vedantists who sought to realise identity with Atman that is the identity of the world soul and his one self or Atman--"Tat twam asi". Alone the jnyani sat, in he did not flee alone to the Alone' exactly as did Plotinus. Buddhists' psyclology p. 144, Rhys Davides.

तात्पर्य इतकेंच की डॉ. नियोगींचा युक्तिवाद समाधानकारक नाही. या बाबतीमध्ये घरचा मनुष्य म्हणेल तें जास्त प्रमाण मानलें पाहिजे. प्रत्यक्ष बौद्ध लोकांनी तर असें ठामून सांगितलें आहे की 'आत्मा' अशी वस्तूच नाही. 'पंचस्कंध' मात्र खरे आहेत. आणि या पंचस्कंधांच्या परंपरेने जें चक्र उत्पन्न झालें आहे त्यापासून सुटका करून घेणें हाच काय तो दुःखनिवृत्तीचा मार्ग आहे. 'नात्मास्ति स्कंधमात्रं तु क्लेशकर्माभिसंस्कृतम् । अंतराभवसंतत्या कुक्षिमेति प्रदीपवत् ॥' ही 'अंतराभवसंतति' उपनिषदाच्या 'आत्मतत्वा'हून अगदी भिन्न आहे. आता ही गोष्ट खरी आहे की, अभिधर्मकोशाची रचना आणि भगवान बुद्ध ह्यांच्यामध्ये शेकडो वर्षांचें अंतर आहे. पण साऱ्या बुद्धवाङ्मयांत हीच अडचण आहे. त्यावरून निदान इतकें मात्र सिद्ध होतें की, हिंदुधर्मीय लोक बुद्धाला अनात्मवादी समजले, तें कांही चूक नाही. बौद्ध वाङ्मयच तसें दाखवितें. 'अजात', 'असंखात', 'अव्वत' इत्यादि शब्दांनी, निर्वाण हें भावरूप आहे असें त्याचें मत होतें, असें डॉ. नियोगी म्हणतात. परंतु निर्वाणाची कल्पना कशी होती हें मी माझ्या पुस्तकांत (Science of Yoga, vol. 1) दाखविलें आहे. जळणाचा पुरवठा न झालेला अग्नी ज्याप्रमाणें आपोआप विझून जातो त्याप्रमाणे तृष्णेचा निरोध झाला म्हणजे हें पंचस्कंधात्मक चक्र आपोआपच बंद होतें. या अवस्थेमध्ये आणि 'शांति निर्वाणपरमां मत्संस्थामधिगच्छति' ह्या गीतावाचनांत पुष्कळ फरक आहे.

भगवान बुद्ध अवैदिक होता ही मूर्ख हिंदु लोकांची अवास्तव कल्पना आहे, असें त्यांचें मत आहे, तेंहि भ्रम उत्पन्न करणारें आहे. आम्ही कोणाला 'वैदिक' समजत आलों आहोंत? वेदाच्या तत्त्वज्ञानासारखें कोणी कांही बोलला म्हणजे आम्ही त्याला वैदिक समजलों नाही. त्या तत्त्वज्ञानाच्या आधारावर जी साधनपरंपरा उत्पन्न झाली तिच्या ठिकाणीं निष्ठा ठेवणाऱ्याला आम्ही वैदिक समजतों. शोपेनहावर आणि पाल डायसेन यांसारखे कैक वेदान्ततत्त्वज्ञानाला डोक्यावर घेणारे झाले, म्हणून कोणी त्यांना वैदिक म्हटलें नाही. आणि तेहि स्वतःला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ख्रिस्तानुयायीच म्हणवीत होते. डॉ. नियोगी ज्यांचा तिरस्कार करतात, त्या सोवळ्याओवळ्यांत गुरफटलेल्या अडाणी लोकांपासून तों भगवान् शंकराचार्यांसारखे विज्ञानी, भगवान रामकृष्णांसारखे अनुभवी, वगैरे हजारो वर्षांच्या परंपरेंतील यच्चयावत् हिंदु म्हणविणारे, असेंच सप्रमाण समजत आले आहेत. आता, विसाव्या शतकानें आणि पाश्चात्यांच्या प्रभावानें आपण जास्त परिणत झालों आहोंत, असें डॉ. नियोगींना वाटत असलें तर, तत्त्वज्ञानाचा आणि साधनाचा काय संबंध आहे, असें म्हणून त्यांनी हवें त्याला खुशाल वैदिक म्हणावें. तो एक अभिनव विचार-संप्रदाय होईल. त्यामुळे आजपर्यंतची हिंदुधर्मीयांची समजूत अयोग्य ठरूं शकत नाही.

आता आणखी दोन मुद्यांचा विचार करूं. शंकराचार्यांनी बुद्धधर्माची भारतांतून हकालपट्टी केली असें हिंदुधर्मीहि समजत नाही. तें काम त्याच्या पूर्वीच कुमरिलासारख्यांनीच केलें. होतें. आणि खरें म्हटलें तर बुद्धधर्माची हकालपट्टी केली हेंहि म्हणणें सत्य नाही. लोकांना त्याचें सत्य स्वरूप कळल्यामुळे त्याविषयीची आस्था नाहीशी होऊन आपोआपच तो नाहीसा झाला. (Buddhism declined for the most part, because people no longer cared for it; not that it was suppressed by force. Imperial Gazetteer of India, vol 11. p. 299.) अशी त्याच्याविषयी अनास्था असूनहि प्रत्यक्ष बुद्धाविषयी मात्र आमच्या लोकांनी कधी अनादर दाखविला नाही. हें तर हिंदु धर्मीयांचें वैशिष्ट्यच आहे. शंकराचार्यांचें स्तोत्र म्हणून त्यांनी जो आधार घेतला आहे त्याला इतिहासदृष्ट्या कांही किंमत नाही. शंकराचार्यांच्या नांवावर अनेक ग्रंथ व हवीं तितकीं स्तोत्रें आहेत. कोणीहि इतिहासज्ञ तीं सारीं भगवान आचार्यांचीं मानीत नाही. तरीपण दशावतार स्तोत्र त्यांचें आहे असें म्हटलें तरी त्यांत कांही विघडत नाही.

हिंदुधर्मानें कधी कोणाचा द्वेष केला नाही आणि दंतकथा व काव्यें सोडलीं तर छळ केल्याचाहि पुरावा नाही. उलट भगवद्गीतेनें म्हटल्याप्रमाणे

यद्यत् विभूतिमत्सत्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तद्देवावगच्छ त्वं मम तेजोंशसंभवम् ।।

अथवा श्रीसमर्थांनी म्हटल्याप्रमाणे 'जेथे कांही विशेष गुण । तेथें सद्गुरूचें अधिष्ठान ।' अशीच त्याची धारणा आहे. मात्र इतकेंच की अशी धारणा असली म्हणून तो आपलें सोडून दुसऱ्याचे मागे लागावयासहि सांगत नाही. 'स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धि लभते नरः'। अथवा श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मो भयावहः।' असा त्याचा अनुभव आहे. म्हणून आपल्या अधिष्ठानावर अढळ राहून कोणालाहि मान देण्यास तो शिकवितो. मात्र इतकेंच की तो दुसऱ्याचा आदर करतो, अनुसरण करीत नाही. अगदी अलीकडचें उदाहरण घ्यावयाचें म्हटलें तर गांधीजींचेंच घेतां येईल. आम्ही सनातनी लोकहि एक राष्ट्रपुरुष अथवा महापुरुष म्हणून त्यांचा आदर करतों. परंतु अहिंसा, मुसलमानधार्जिणेपणा, इ० अनेक गोष्टींविषयींच्या त्यांच्या विचित्र कल्पनांना अनुकरणीय समजत नाही. त्याप्रमाणेच, गौतम बुद्धाची भूतदया, मानवजातीच्या कल्याणाची कळकळ, त्याचा त्याग इ० अनेक सद्गुणांकरिता त्याला वंद्य मानतों; परंतु अनुकरणीय समजत नाही. भागवतादि ग्रंथांत श्रीविष्णूच्या मत्स्यकच्छादि साऱ्या अवतारांचीं पूज्य भावानें केलेलीं वर्णनें आणि भगवान बुद्धाला अवतार म्हणत असतांहि, तो वैदिक धर्मीयांकरिता अवतार नव्हता असें जें म्हटलें आहे त्याचें कारण हेंच आहे. आचारदृष्ट्या व तात्त्विक दृष्ट्या इतका विरोध असूनहि, भगवान आचार्यांनी बुद्धाला योगीचक्रवर्ति म्हटलें असलें तर त्यांत त्यांच्या अंतःकरणाचा थोरपणाच दिसून येतो.

भगवान बुद्धानें साठ शिष्यांना चारहि दिशांना रवाना केलें. व त्याचेंच अनुकरण करून बौद्धधर्मीयांनी बुद्धाच्या धर्माचा जगांत प्रसार केला आणि त्यावरून 'कृण्वन्तो विश्वमार्यम्'। ही वैदिक ऋषींची वांछा पूर्ण केली, ह्या म्हणण्यांत काय तथ्य आहे तें पाहूं. 'बहुजनहिताय, बहुजनसुखाय, लोकानुकंपाय' अशी तर वैदिक ऋषींचीहि वांछा 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' म्हणण्यांत होतीच. तरी पण त्यांत एक गोष्ट होती.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या बहुजनहिताकरिता आदिकल्याण, मध्यम कल्याण, पर्यवसान कल्याण अशीं सारीं कल्याणें सहज पदरांत पडतील अशी धर्माची जी घडी वैदिक ऋषींनी बसवून दिली होती ती मोडण्याचा बुद्धानें प्रयत्न केला. या प्रयत्नामुळे सीरिया, असीरिया, अलेक्झांड्रिया, आंटिओक इ० पश्चिम देश व भारताच्या पूर्वेकडील चीन, जपानपर्यंत पसरलेल्या मानवजाती यांच्यांत कोणतें 'आर्यत्व' अवतरलें व त्यांचें पूर्वीच्याहून कांही वेगळें असें कल्याण झालें हा ऐतिहासिक वादाचा प्रश्न आहे. येवढयाशा लेखांत त्याचा समावेश होऊं शकणार नाही. परंतु पश्चिम देशापुरतें तरी त्याने काय केलें याची साक्ष हॅवेलने दिली आहे. तो उतारा डॉ. नियोगींनी स्वत: दिलाच आहे. (It is more than justifiable to conelude that the Buddhist missions establisled by Ashok prepared the soil from which both Christianity and Islam afterwards sprang.) पूर्वेकडे पासिफिक महासागरांतील विस्तीर्ण भूप्रदेशाचें इस्लामीकरण पाहिलें म्हणजे तेथेहि हॅवेलचें म्हणणेंच बरोबर आहे असें वाटूं लागतें. असा बौद्ध धर्माचा परिणाम ह्या देशांत कां व्हावा हें पाहण्याकरिता वैदिक ऋषींच्या परंपरा त्याने कोठे सोडल्या हें थोडक्यांत पाहिलें पाहिजे.

यावर कोणीहि असें म्हणूं शकतो की परिणाम कांहीहि असो, वैदिक तत्त्वाचा प्रसार त्याने केला असला तर 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' असें कां म्हणूं नये ? तर त्याचा थोडा विचार करूं. ही गोष्ट बौद्ध वाङ्मयावरूनच दिसून पडते की, हा जो परदेशांत प्रसार झाला, तो विशेषत: प्रचाराच्या दृष्टीने मुद्दाम विशेष स्वरूप दिलेल्या महायान पंथाचा झाला. खुद्द भगवान बुद्धाने दिलेल्या हीनयानाचा नव्हे. भगवान बुद्ध निर्वाणास जाऊन थोडा वेळ झाला नाही तोंच त्याच्या धर्माला हीनयान म्हणून घ्यावें लागलें ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. तसें होणें अपरिहार्यच होतें. सद्गुणाच्या अव्यवहारार्थ अशा पराकाष्ठेवर अथवा केवळ तत्त्वज्ञानाच्या पायावर उभारलेला धर्म–पंथ मनुष्य-जातीच्या पचनीं पडत नाही. एक तर तो लवकरच हवेंत विरून जातो अथवा 'या गालांत मारली तर तो गाल पुढे कर' असें म्हणणाऱ्या ख्रिस्त गुरूच्या शिष्या-प्रमाणे, गुरूचें तोंड काळें करणारा होतो. थोडक्यांत असें दाखवितां येईल की बुद्धाचें तृष्णाशांतीचें आणि संन्यासाचें एकांतिक ध्येय लोकांच्या पचनीं पडत नाही हें पाहून, महायानाने बुद्धालाच परमेश्वर बनवलें आणि मग बुद्ध, ध्यानी बुद्ध, बोधिसत्त्व, अवलोकितेश्वर, मंजुश्री इ० त्याच्या ज्या अनेक आवृत्त्या निघाल्या त्याची यथार्थ कल्पना विनयतोष भट्टाचार्य यांच्या Buddhist Econography या पुस्तकावरून सहज येते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें बुद्धाच्या निर्वाणा-नंतर सुमारें ३०० वर्षेपर्यंत त्याची मूर्ति देखील लोकांस ठाऊक नव्हती. त्यानंतर त्याची मूर्ति बनविली गेली, ती बुद्धाच्या मूळच्या तत्त्वाला किती धरून असेल कोण जाणे. प्रसार झाला म्हणून जो इतिहासांत दिसतो तो तिचा ! 'दु:खनिरोधगामिनी पटीपदा आर्य-सच्चं'चा नव्हे. क्षेमेन्द्रासारख्याच्या काव्यांत वर्णि-लेल्या प्रमाणे कांही निष्ठावान जीमूतवाहन कोणत्याहि धर्मांत थोडे फार असतातच; परंतु त्या त्या देशांतील यच्चयावत् मानव समाजाच्या दृष्टीने पाहिलें तर 'पंचशील' आणि 'दशबल' ह्यांच्यापेक्षा 'अनृत-संहिता: मनुष्या:' असेंच दिसून पडतें.

म्हणजे, प्रसार झाला तो 'नात्मास्ति स्कंधमात्रं तु' या तत्त्वाचा आणि व्यक्तिपूजेचा. या दोनहि गोष्टी शुद्ध औपनिषदिक तत्त्वांच्या विरुद्ध होत्या. परंतु अशा त्या थोडया विरुद्ध असल्या तरी हरकत नव्हती. 'साधनानां अनेकता' आणि 'उपास्यानां अनियम:' यांत कोठे तरी त्या बसल्या असत्या. परंतु ज्या रीतीने त्या लोकांस दिल्या गेल्या त्या रीतीने त्या वैदिक ऋषींच्या आर्यत्वाच्या नुसत्या विरुद्धच नव्हे तर विध्वंसक होत्या. कसें तें अगदी थोडक्यांत पाहूं. वैदिक तत्त्वज्ञान 'सर्वं खल्विदं ब्रह्म' आणि 'तत्त्वमसि' अशी गर्जना करणारें होतें, म्हणजे व्यक्तीच्या पुढे आकाशासारखा विशाल आशावाद ठेवणारें होतें. याच्या उलट, 'सर्वं क्षणिकं सर्वं दु:खं' म्हणून सर्वांचा त्याग करून गेंड्या-प्रमाणे एकाकी राहावें असें शिकविणारा हीनयान

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कमालीचा नैराश्यवादी (pessimist). याचा एक परिणाम असा झाला की, वैदिक ऋषींनी समाजाची अत्यंत विचारपूर्वक जी एक बांधणी बांधून दिली होती तिचा अनादर झाला. 'वेदान्तगो ब्राह्मणः स्यात् क्षत्रियो विषयी भवेत् । वैश्यो धनसमृद्धः स्यात् शूद्रः सुखमवाप्नुयात्' यांतील अर्वाचीन रोमा रोलां सारख्यांना देखील चकित करून सोडणारी अत्यंत दूरदृष्टि आणि परस्परावलंबन हीं नाहीशी होऊन त्यांच्या जागीं फार प्रव्रज्या बोकाळली. वर्णव्यवस्था जन्मजात होती किंवा नाही हा वाद बाजूला ठेवून ती जन्मजात नव्हती असें घटकाभर म्हटलें तरी तिने व्यक्ति आणि समाज ह्यांची जी एक हितकारक बांधणी करून दिली होती त्या ऋषींच्या व्यावहारिक दृष्टीचा भगवान बुद्धाच्या ठिकाणीं अत्यंत अभाव होता. इतकेंच नाही तर प्रचाराच्या भरांत त्यांनी थोडा स्वतःशींच विरोध केला होता. प्रायोपवेशनाच्या नंतर त्यांना जो दृष्टान्त झाला होता त्यांतील नायकिणीने हेंच सुचविलें होतें की शरीर ही एक सारंगी आहे; जास्त ताणल्या जर सारंगीच्या तारा तुटून आतात. आणि ढिल्या ठेवल्या तर संगीत उत्पन्न होत नाही. त्याचप्रमाणे ह्या शरीराच्या सर्व गोष्टी मध्यम मानांत करून घेतल्या पाहिजेत. त्याने स्वतःच्या मार्गाला 'मध्यम मार्ग' म्हटलें आहे. परंतु त्यांच्या हीनयानामध्ये ह्या उपदेशाच्या अगदी उलट एकांतिकता आहे. म्हणून तर 'महायाना'ची गरज पडली. 'गीतारहस्यां'त तर अशीहि समजूत उल्लेखिली आहे की, महायानाच्या मुळाशीं गणेश व श्रीकृष्ण ह्यांच्याच प्रेरणा होत्या.

जी वर्णांची अवस्था तीच आश्रमांची. प्रचाराकरिता हल्ली असें नेहमीच सांगितलें जातें की शंकराचार्यांनी संन्यासाचा प्रसार केल्यामुळे भारतवर्षाचा ऱ्हास झाला. वस्तुस्थिति ह्याच्या अगदी उलट आहे. वैदिक ऋषींच्या तत्त्वाप्रमाणे संन्यासाचा अधिकार फक्त ब्राह्मणांना होता. व तोहि त्यांनी हवा तेव्हा घ्यावयाचा नसे. मनूने सांगितल्याप्रमाणे 'ऋणानि त्रीन् अपाकृत्य' म्हणजे तीनहि ऋणांतून उत्तीर्ण झाल्यावर घ्यावयाचा असे. तसें न करतां समाजाशीं संबंध तोडून तसें तो करूं म्हणेल तर 'अनपाकृत्य मोक्षं तु सेवमानो व्रजत्यधः ।' असा त्याचा अधःपात सांगितला आहे. ही सर्व व्यवस्था मोडून टाकून हवा त्याला, हव्या त्या वयांत व अवस्थेंत संन्यास घेण्याची मोकळीक भगवान बुद्धाने दिली. इतकेंच नव्हे तर स्त्रीला या मार्गांत ओढलें असतां धर्मविनाश ओढवेल ह्याची खात्री असूनहि त्यांनी केवळ भिडेला बळी पडून त्यांनाहि प्रव्रज्या दिली. ही सारी गोष्ट सुप्रसिद्धच आहे. त्यांनी संन्यास असा नुसता सवंग नाही केला तर वाटल्यास तो सोडून देऊन पुन्हा गृहस्थाश्रमाचीहि सवलत दिली. या सर्व गोष्टींचा परिणाम बौद्धधर्मावर काय झाला त्याची साक्ष इतिहासांत दिसून येते. शंकराचार्यांनी उलट हा संन्यास पुनः वर्णधर्मानुसार मर्यादित करून राष्ट्राचें हितच केलें. थोडक्यामध्ये असें म्हणतां येईल की भारताच्या खाणींत उत्पन्न झाला असल्यामुळे वैदिक धर्म आणि बौद्धधर्म यांचे तोंडवळे सारखे असले तरी त्यांच्यांत विसदृशपणा इतका आहे की तीं भावंडें आहेत असें म्हटलें तरी सहोदर भावंडें नाहीत असेंच म्हणावें लागेल. अशा अनेक गोष्टी जर लक्षांत घेतल्या तर हिंदुधर्मांत भगवान बुद्धाचें स्थान काय आहे हें कोणाच्याहि सहज लक्षांत येईल. मागील दृष्टान्त घेऊनच बोलावयाचें म्हणजे गांधीजींना ज्याप्रमाणे आम्ही सनातनी लोकहि थोर मानतों व वंदनहि करतों; परंतु त्याबरोबरच पाश्चात्य बुद्धीचा पगडा जास्त बसल्यामुळे हिंदुधर्माचें हृद्‌गत न समजणारे समजतों, त्याप्रमाणेच भगवान बुद्धालाहि श्री विष्णूचा साक्षात अवतार म्हणून वंदनीय समजतों. परंतु वैदिक ऋषींच्या धर्माचें हृद्‌गत न समजणारे आणि म्हणूनच त्यांच्या आर्यत्वापासून दूर गेलेले समजतों.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सुप्रसिद्ध नाटककार खासदार मामा वरेरकर यांची त्रिदिवसीय व्याख्यानमाला

संक्षिप्त प्रतिवृत्त

दि. १६–१७ व १८ आक्टोबर १९५७ या तीन दिवशीं महाराष्ट्राचे ख्यातनाम व लोकप्रिय युगप्रवर्तक नाटककार मामा वरेरकर, संसद सदस्य यांची 'मराठी रंगभूमि' या विषयावर व्याख्यानमाला महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कादंबरीकार व टीकाकार श्री. पु. य. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक समितीच्या विद्यमानें नाटयमंदिराच्या प्रांगणांत पार पडली. प्रस्तुत मालेंतील व्याख्यानांचा सारांश थोडक्यांत पुढीलप्रमाणे दिला जात आहे.

मराठी रंगभूमीचा आरंभकाल

१८४३ सालीं सांगली येथे विष्णुदास भाव्यांच्या नाटकाने मराठी रंगभूमीचा इतिहास आरंभ होण्यापूर्वीच गोमांतक व तंजावर या भागांत राजाश्रयाने नाटकें होत होतीं. याच कालांत बंगाली रंगभूमीवरहि नाटकें होत होतीं. एका रशियनाने इंग्रजी नाटकाचें बंगाली भाषांतर रंगभूमीवर आणलें होतें. इकडे मुंबईला गुजराथी, मराठी व ऊर्दू या भाषांतील नाटकें होत. प्रथमतः पौराणिक नाटकेंच रंगभूमीवर आलीं. त्या काळचे नट अभिनयकुशल होते. साहित्यिक नव्हते. शाहूनगरवासी मंडळीने चंद्रसेन, विकारविलसित, हिंमतबहाद्दर आदि हॅम्लेटचीं रूपांतरें रंगभूमीवर गाजविलीं.

किर्लोस्कर व स्वदेश हितचिंतक नाटक मंडळीची स्पर्धा

१८८१ सालीं किर्लोस्करांनी कन्नड व गुजरातीच्या धर्तीवर शाकुंतल नाटक तयार केलें. त्यांत एकटया दुष्यंतालाच ११५ पदें आढळतात. भाऊराव कोल्हटकर शकुंतलेचें काम करायला लागल्यापासून शकुंतलाहि गाऊं लागली. या तऱ्हेने संगीताला महत्त्व येऊं लागलें. सौभद्र व रामराज्यवियोग हीं किर्लोस्करांचीं आणखी दोन नाटकें याच वेळीं गाजलीं.

शिरवळकर, नरहरबुवांची चित्तचक्षु इ. नाटकमंडळयाहि या वेळीं नाटकें करीत होत्या. या नाटक कंपन्यांत विदर्भांत विशेष गाजलेली स्वदेश हितचिंतक नाटकमंडळी ही एकमात्र सुशिक्षित नटांची होती. किर्लोस्कर व स्वदेशहितचिंतक या नाटकमंडळयांच्या स्पर्धेतूनच रंगभूमीची त्या वेळीं विशेष प्रगति झाली.

नव्या तंत्राचा उदय व उत्कर्ष

कोल्हटकरांच्या 'वीरतनया'ने मात्र जुनें शेक्सपियर व कालिदासाचें तंत्र बदलून संगीतांत शास्त्रोक्त संगीताची नवी परंपरा निर्माण केली. त्यानंतर त्यांचें 'मूकनायक' हें नवीन तंत्राचें नाटक विशेष गाजलें. माधवराव पाटणकरांनी या परंपरेला आणखी धक्का दिला. गिरणी, कारखाना, गोदी या ठिकाणच्या कामगारांना समजतील अशा सोप्या भाषेंतलीं नाटकें रंगभूमीवर आणलीं. सुशिक्षित व मध्यम वर्गांत लोकप्रिय असलेलीं शारदा, शाकुंतल, सौभद्र हीं किर्लोस्कर व स्वदेशहितचिंतक कंपन्यांचीं नाटकें आणि खालच्या थराकरिता पाटणकरांचीं नाटकें यांतला दुवा अशी नाटयकला याच वेळीं स्थापन होऊन रंगभूमि उत्कर्षाला पोचल्याचा भास या काळीं होऊं लागला.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठी रंगभूमीकडून लोकरंजनापेक्षा लोकक्षोभाचें कार्य अधिक

स्वातंत्र्याच्या चळवळींत पत्रकर्त्यांपेक्षा अधिक मोलाचें कार्य रंगभूमीने केलें. संगीत नाटकांपेक्षा गद्य नाटकांकडून हें कार्य विशेष घडलें. तत्कालीन स्वातंत्र्यसैनिकांना व नेत्यांना नाटक मंडळ्या हें मोठें आश्रयस्थान असे. सरकारी वक्रदृष्टीची शिकार तत्कालीन नाटकमंडळीस व्हावें लागत असे. केवळ पैसा मिळविण्याची दृष्टि नाटक मंडळ्यांनी ठेवली नव्हती.

संगीताचा नाट्यकलेवर परिणाम

संगीताने मात्र खऱ्या नाट्यकलेचा ऱ्हास होत गेला. नाटकापेक्षा गाण्याला अधिक महत्त्व येऊं लागलें. सुदैवाने मराठी रंगभूमीने आपली संगीताची ठेवण कायम ठेवली. बंगालीने मात्र अँग्लोइंडियन धर्तीवरील रवींद्र संगीताची कास धरली.

नाटक कंपन्यांवर सरकारी रोष

नाटक मंडळ्यांवर सरकारी वक्रदृष्टि असल्यामुळे अनेकांनी तमाशांचा आश्रय घेतला. या कालांत मी (मामा वरेरकर) तमाशे लिहूं लागलों व नाटककार म्हणूं ओळखला जाण्यापूर्वी तमाशेवाला म्हणून जाहीर झालों. परंतु चालूं अर्थानें तमासगीर (तमाशा करणारा) मात्र नव्हतों.

कोल्हटकरांचा वारसा

कोल्हटकरांचा खरा वारसदार मीच (मामा वरेरकर) आहे. माझ्यानंतर ४ वर्षांनी गडकरी पुढे आले. दुर्दैवाने ते अगोदर मरण पावले, म्हणून त्यांच्यानंतर माझें नांव घेतलें जातें. कोल्हटकरांनी कुणाचेंहि अनुकरण केलें नाही, हेंच अनुकरण मी केलें. गडकऱ्यांनी मात्र कोल्हटकरांच्या केवळ कोटयांचेंच अनुकरण केलें. खाडिलकरांच्या 'मानापमाना'वरहि कोल्हटकरांच्या 'मूकनायका'ची अनेक प्रकारें छाप पडलेली आढळते. कै. देवल कोल्हटकरांचे पहिले शिष्य होते असें म्हटलें तर खोटें समजलें जातें. परंतु याच्या मुळाशीं गडकऱ्यांची प्रशंसा करण्याचा विडा मुंबई पुणेकरांनी उचलला आहे, हें महत्त्वाचें कारण होय. गडकऱ्यांना मोठेपणा देण्याकरिता कोल्हटकरांना कमी लेखलें जातें याला कारण कोल्हटकर विदर्भांतील होते, हेंच होय.

खाडिलकरांचीं नाटकें

लोकक्षोभासाठीं रंगभूमीचा उपयोग प्रथमतः खाडिलकरांनीच करून घेतला. कीचकवधांत राजकारण आहे हें आज पटत नाही; परंतु कर्झनचे उद्‌गार कीचकाच्या तोंडीं घातल्यामुळे कीचकाला पाहिल्याबरोबर लोकांना लॉर्ड कर्झनची आठवण होत असे. त्यामुळे सरकारने त्यावर बंदी घातली व ती बरीच वर्षें कायम होती. त्या काळीं वंगभंगाची चळवळ महाराष्ट्राने हातीं घेऊन यशस्वी करून दाखविली, त्या वेळीं वंगभंगावर लिहिलेलीं सुमारें ८० नाटकें जप्त झालीं होतीं. भाऊबंदकी नाटकांत त्रिंबकराव प्रधान टिळकांप्रमाणे पोशाख करून रामशास्त्र्यांची भूमिका वठवीत. पुढे हा पोशाख बदलला पण परिणाम कायम राहिला.

तमाशांचा उपयोग

पारतंत्र्याच्या काळांत लिखित नाटकें पोलिसांकडे तपासण्याकरिता जात. तमाशे अलिखित असल्यामुळे या प्रकारची अडचण तमासगिरांना कधीच भासली नाही. आणि त्यामुळे कित्येकदा नाटकाऐवजी तमाशांचा लोकक्षोभाकरिता उपयोग करून घेतला गेला.

गडकऱ्यांचीं नाटकें

प्रथमतः गडकऱ्यांचें 'एकच प्याला' पडलें. कै. अच्युतराव कोल्हटकरांनी त्या नाटकावर लिहून लोकांना पटविलें. गडकऱ्यांच्या मृत्यूने या नाटकास विशेष उठाव मिळाला. पुनर्विवाह करणारा माणूस कधीच यशस्वी होत नाही, हें 'प्रेमसंन्यास'ने दाखविलें व पातिव्रत्याचे फाजिल चोचलेहि वेगळ्या प्रकारें दर्शविले. 'पुण्यप्रभाव' हें नाटक प्रेमसंन्यासपेक्षाहि न पटणारें आहे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वरेरकरांची नाटकें

'संन्याशाचा संसार' या नाटकाचा आरंभ 'महाराष्ट्रा'च्या कचेरींत झाला. हें नाटक नंतर मुंबईंत गाजलें. स्वाभाविकपणे त्याचा परिणाम जो व्हायचा तोच झाला. स्वगत गाळण्याची जी फार मोठी चळवळ झाली, त्यामुळे मुद्दामच 'सत्तेचे गुलाम' या नाटकांत स्वगत घातलें गेलें. तरी अजून त्यावर कुणी टीका केली नाही.

मराठी नाट्यसृष्टीच्या इतिहासांतील अपूर्व घटना व ऱ्हास

गांधी व लो. टिळक या दोन थोर पुरुषांच्या नांवाने बालगंधर्व आणि केशवराव भोसले यांनी 'मानापमानाचा' संयुक्त प्रयोग केला. त्याला १७ हजार रुपये उत्पन्न झालें. परंतु याच काळांत नाटकमंडळचांत फाटाफूट होऊन अनेक संस्था निर्माण झाल्या. उत्कर्षाच्या काळांत रंगमदिरें बांधून न ठेवल्यामुळे नाटकमंडळचा घरादारास मुकून स्वत: कोसळून पडल्या. याच वेळीं हास्यकारक व विनोदी नाटकांचे प्रवेश सुरू झाले. त्यामुळे नट, नाटक व रंगभूमि यांचा दर्जा खालावला. एवढेंच नव्हे तर हीं नाटकें जसजशीं उत्पन्न होत गेलीं तसतशी प्रेक्षकांची नीतिमत्ता विघडत जाऊन अध:पातास प्रारंभ झाला.

मराठी रंगभूमीचें पुनरुज्जीवन

सांगली येथे मराठी रंगभूमीचा शताब्दिमहोत्सव झाल्यापासून जुन्याचें पुनरुज्जीवन झालें. १९४१ मध्ये रांगणेकरांनी नाट्यनिकेतनद्वारा नवी परंपरा सुरू करून रंगभूमि जिवंत ठेवण्याचें कौतुकास्पद कार्य केलें आहे. सरकारहि उत्तेजन देऊं लागलें आहे. त्यामुळे आज जरी मराठी रंगभूमि समृद्ध नाही तरी भावी वैभवाच्या दृष्टीने निश्चित पावलें मात्र पडत आहेत.

संघाचें नाट्यमंदिर

विदर्भ साहित्य संघाच्या रंगमंदिरामुळे मराठी रंगभूमीला पहिलें घर मिळत आहे. विदर्भानेच आजतागायत नाटक कंपन्यांची खरी जोपासना केली आहे. आज विदर्भाचें राज्य असतें तर हें मंदिर पूर्ण झालें असतें. परंतु मुंबई राज्यांत सामील झाल्याचे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत.

× × ×

प्रथम दिवशीं संघाध्यक्ष माननीय बाळासाहेब ढवळे यांनी श्री. मामा वरेरकर यांचेबद्दल गौरवपर भाषण करून व्याख्यानमालेस आरंभ केला. अनेक संस्थांनी मामांना पुष्पहार घालून त्यांचा सत्कार केला. शेवटच्या दिवशीं उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारिणीतर्फे सत्कार करण्यांत आला. पूर्वसंघाध्यक्ष श्री. बाबासाहेब देशपांडे यांनी समारोप केल्यानंतर प्रा. माणिक के. वैतुले यांचेकडून आभारप्रदर्शन होऊन हा कार्यक्रम संपला.

(महाराष्ट्र व तरुण भारताच्या आधारें)

मराठवाड्यांतील एकमेव मराठी मासिक
मराठवाडा साहित्य परिषदेचें मुखपत्र
प्रतिष्ठान
दर महिन्याच्या १ तारखेस प्रसिद्ध होतें
समीक्षा, ललित, काव्य, संशोधन इत्यादि विषयांवरील मौलिक साहित्य
आजच वर्गणीदार व्हा
वार्षिक वर्गणी रु. ५ किरकोळ अंक ८ आ.
जाहिराती स्वीकारल्या जातात
मराठवाड्याबाहेर एजन्सी देणें आहे. लिहा.
"प्रतिष्ठान" कार्यालय,
इसामिया बाजार,
हैदराबाद-दक्षिण.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

प्रा. श्री. गो. काशीकर,
सरचिटणीस, वि. सा. संघ, यांजकडून

केंद्रवृत्त, नागपूर

माननीयांच्या भेटी

(१) दि. ३१–१०–५७ रोजीं सायंकाळीं ६–३० वाजतां रा. सा. के. वि. गोडबोले, माजी दिवाण, फलटण संस्थान यांनी विदर्भ साहित्य संघाला भेट दिली.

(२) माननीय श्री. हितेंद्र देसाई, शिक्षणमंत्री, मुंबई राज्य, यांनी आपल्या धावत्या दौऱ्यांत विदर्भ साहित्य संघाला दि. १४–११–५७ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां भेट दिली आणि संघाच्या रंगमंदिराची पाहणी करून विदर्भ साहित्य संघाच्या कार्याबद्दल प्रशंसोद्गार काढले.

'सांस्कृतिक कार्यक्रम समिति' तर्फे झालेलीं व्याख्यानें––

(१) दि. ४–११–५७ ते ६–११–५७ पर्यंत रा. सा. के. वि. गोडबोले, माजी दिवाण फलटण संस्थान, यांचीं सायंकाळीं ६–३० वाजतां "वाल्मीकि रामायणासंबंधी कांही विचार" या विषयावर लो. ना. बापूजी अणे, यांच्या अध्यक्षतेखाली तीन व्याख्यानें झालीं.

(२) दि. १८–११–५७ रोजीं सायंकाळीं ७–३० वाजतां डॉ. दि. का. गर्दे, लोकमान्य–टिळक–राज्यशास्त्राचे प्राध्यापक व पुणें विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख, यांचें "महाराष्ट्राची सांस्कृतिक अस्मिता" या विषयावर उद्बोधक व विद्वत्तापूर्वक व्याख्यान झालें.

(३) दि. १९–११–५७ रोजीं सायंकाळीं ६–३० वाजतां श्रीज्ञानेश्वर पुण्यतिथीनिमित्त साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास यांचें सुश्राव्य व्याख्यान झालें.

(४) **हेमंत व्याख्यानमाला**—विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक कार्यक्रम समितितर्फे **साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास यांची दहा दिवसांची व्याख्यानमाला** अत्यंत यशस्वी रीतीने पार पडली. महर्षि व्यासांच्या प्रभावी लेखणींतून उतरलेल्या आपल्या सांस्कृतिक इतिहासांतील श्रेष्ठ पुरुषांच्या व्यक्तिरेखा साहित्याचार्यांच्या प्रतिभासंपन्न वाणींतून अशा रीतीने चित्रित केल्या गेल्या की त्यामुळे नागपुरांतील सुसंस्कृत जनता अक्षरशः मंत्रमुग्ध होऊन गेली. व्याख्यानाचा रंग दिवसेंदिवस वाढतच गेला आणि श्रोत्यांची गर्दी इतकी वाढली की शेवटच्या दिवसांत तर विदर्भ साहित्य संघाच्या भव्य रंगमंदिरांतील सर्व जागा स्त्रीपुरुषांनी अक्षरशः फुलून निघाली. नागपुरांत प्रथमच दहा दिवसांची भीत–भीत आयोजित केलेली व्याख्यानमाला इतकी विलक्षण लोकप्रिय झाली की सर्व लोकांनी आणखी ती दहा दिवस वाढवावी असा आग्रह केला. परंतु पूर्वनियोजित कार्यक्रमासाठी शास्त्रीबोवांना बाहेरगावीं जावयाचें असल्यामुळे तें शक्य झालें नाही.

साहित्याचार्यांना विदर्भ साहित्य संघातर्फे चांदीचें तबक, श्रीफल आणि ३५१ रुपये मानद्रव्य देण्यांत आलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्य अकादमीच्या साधारण सभेवर डॉ. वि. भि. कोलते यांची सदस्य म्हणून नियुक्ति

डॉ. वि. भि. कोलते यांची साहित्य अकादमीच्या साधारण सभेवर सदस्य म्हणून नियुक्ति करण्यांत आली आहे. डॉ. कोलते यांचें नांव विदर्भ साहित्य संघानें सुचविलें होतें. या नियुक्तीबद्दल विदर्भ साहित्य संघातर्फे डॉ. कोलते यांचें आम्ही अभिनंदन करतों.

माननीय राज्यपालांची भेट

दि. २९-१२-५७ ला सकाळीं १० वाजतां विदर्भ साहित्य संघास भेट देण्याचें मुंबई राज्याचे राज्यपाल माननीय श्रीप्रकाश यांनी मान्य केलें असून त्यावेळीं लोकनायक बापूजी अणे यांच्या अर्ध पुतळ्याचें ते अनावरण करणार आहेत.

कै. हरिभाऊ नेने पुण्यतिथि

कै. हरिभाऊ नेने यांचा तिसरा स्मृतिदिन विदर्भ साहित्य संघ व विदर्भ संशोधन मंडळ यांच्या वतीने शुक्रवार दि. २२-११-५७ रोजीं सायंकाळीं ५—३० वाजतां विदर्भ साहित्य मंदिरांत साजरा झाला. याप्रसंगीं लो. ना. बापूजी अणे यांच्या अध्यक्षतेखाली विदर्भ संशोधन मंडळाच्या वतीने संशोधन लेखसंग्रह भाग १ व विदर्भ साहित्य संघाच्या वतीने भाग २; ह्या कै. हरिभाऊंच्या संशोधनात्मक लेखांच्या दोन संग्रहांचा प्रकाशन समारंभ व छायाचित्राचें अनावरण करण्यांत आलें.

विदर्भ साहित्य संघाने प्रकाशित केलेल्या संग्रहाकरितां खालील सद्गृहस्थांनी देणग्या देऊन वि. सा. संघाला साह्य केलें.

श्रीमंत दादासाहेब धनवटे,	नागपूर	१००	रुपये
श्री. वा. र. दिवेकर,		५१	
श्री सहकारी संस्था		५१	
श्री. म. म. वा. वि. मिराशी		१०	
श्री. स. वि. लिमये, स्नेहसंवर्धक मंडळ	,,	५	
श्री. पां. ना. बनहट्टी, सुविचार प्रकाशन मंडळ	,,	२५	
श्री. ल. रा. कुळकर्णी	,,	१०	
श्री. श्री. स. पेंढारकर	अमरावती	१०	

विदर्भ साहित्य संघ ह्या सर्व देणगीदारांचा अत्यंत आभारी आहे.

या समारंभाचे वेळीं खालील थोरांचें शुभसंदेश आले होते. (१) श्रीमान वा. ग. खापर्डे (२) श्री. पूनमचंद रांका (३) श्री. ब. ग. ऊर्फ अण्णासाहेब खापर्डे (४) श्री. वा. ना. देशपांडे (५) श्री. श्री. ग. ह. खरे, (६) श्री. तु. ना. काटकर (७) मा. भालचंद्र.

या सर्वांचे आम्ही आभारी आहोंत.

संशोधनपर लेखांचा ग्रंथ प्रकाशित करून विदर्भ साहित्य संघाने प्रगतिपथावर एक महत्वाची वाटचाल केली आहे.

आजीव सभासद

श्री. श्री. गु. ऊर्फ बाळासाहेब अण्णिगेरी, नागपूर.

* *

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शाखा वृत्त--गोंडवण शाखा

दि. १०-११-५७ रोजीं कन्या महाशाळा, चांदा, येथे माजी अध्यक्ष श्री. गो. बा. पुल्लीवार यांचे अध्यक्षतेखाली कार्यकारिणीची (जुन्या व नव्या) बैठक घेण्यांत आली. तींत खालील कामकाज झालें.

(१) नवीन कार्यकारिणीकडे यापुढे सर्व कारभार देण्यांत यावा, असें ठरलें.

(२) जुन्या कार्यकारिणीने आतापर्यंत केलेल्या कामावद्दल समाधान व्यक्त करण्यांत येऊन पदाधिकाऱ्यांना धन्यवाद देण्यांत आले.

(३) माजी व आजो अध्यक्ष अनुक्रमें श्री. गो. बा. पुल्लीवार आणि भगवतीप्रसाद मिश्र यांचा सत्कार करण्यांत आला.

श्री. भगवतीप्रसाद मिश्र यांचे अध्यक्षतेखाली बैठक सुरू झाली. तींत खालीलप्रमाणे नवीन कार्यकारिणी निवडण्यांत आली.

अध्यक्ष : श्री. भगवतीप्रसाद मिश्र (अगोदरच निवडल्या गेले होते). **उपाध्यक्ष** : श्री. गो. बा. पुल्लीवार. **कोषाध्यक्ष** : श्री. रा. रा. पोटदुखे. **सरचिटणीस** : श्री. ज. गो. सन्त. **चिटणीस** : श्री. न. रा. निमजे. **सदस्य** : श्री. तु ना. काटकर (केंद्रातर्फे) सौ. शकुंतलाबाई देवईकर (अध्यक्षांतर्फे)

याच वेळीं नवीन सांस्कृतिक कार्यक्रम समिति निवडण्यांत आली. (एका वर्षाकरिता)

आमंत्रक : श्री. न. रा. निमजे. **सदस्य** श्री. पु. हृ. धनकर. श्री. उ. वा. ठोलदास.

दि. २४-११-५७ रोज रविवाला सकाळीं ८ वाजतां न्यू इंग्लिश शाळेच्या सभागृहांत वि. सा. संघ गोंडवण शाखेतर्फे कै. ब. रा. ऊर्फ बाबासाहेब देशमुख यांचें निधनाबाबत शोकसभा शाखाध्यक्ष श्री. भगवतीप्रसाद मिश्र यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. तींत निरनिराळ्या व्यक्तींनी कै. बाबासाहेब देशमुखांना आदरांजलि अर्पण करण्यांत आली.

* *

यवतमाळ शाखा

यवतमाळ येथे विदर्भ साहित्य संघाची शाखा स्थापन करण्यांत आली व केंद्रीय कार्यालयाने शाखेला मान्यता दिली आहे. शाखेचें नवीन कार्यकारी मंडळ पुढीलप्रमाणे आहे.

संघशाखाध्यक्षः—श्री. त्र्यं. द. देशमुख पारवेकर, बी. ए , एम्. एल्. ए.

सभासदः—(१) श्री. द. वा. महाजन, वकील; (२) श्री. प्र. रा. देशमुख, वकील; (३) प्रा. राम डोके आणि (४) श्री. ना. ना. हूड.

दि. ३-११-५७ रोजीं लो. ना. बापूजी अणे यांचे अध्यक्षतेखाली एक सभा भरविण्यांत आली होती. त्यांत विदर्भ साहित्य संघाचें या वर्षीचें संमेलन यवतमाळ येथें बोलवावें असें ठरलें. व त्या प्रमाणें केंद्रीय कार्यालयाला आलेलें निमंत्रण स्वीकारण्यांत आलें.

* *

खामगांव शाखा--शाखेतर्फे नाट्यमहोत्सव

विदर्भ साहित्य संघाच्या खामगांव शाखेच्या कार्यकारी मंडळाने, येत्या जानेवारी महिन्यांत प्रजासत्ताक दिनाचे सुमारास, खामगांव येथे नाट्यमहोत्सवाचें आयोजन करण्याचा निर्णय घेतला आहे.

नाट्यप्रयोगांत कामें करणाऱ्या स्थानिक कलावंतांना अधिक उत्तेजन मिळावें, नाट्यकलेची अभिरुचि व दर्जा यांची वाढ व्हावी, या उद्देशानेच वि. सा. संघाच्या खामगांव शाखेने या नाट्यमहोत्सवाच्या कार्यक्रमाचें आयोजन केलें आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ : परीक्षा समिति नागपूर

सप्टेंबर सत्र १९५७ च्या परीक्षांचा निकाल

दि. ७ आणि ८ सप्टेंबर ५७ रोजीं झालेल्या परीक्षांचा निकाल पुढीलप्रमाणे घोषित करण्यांत येत आहे. साहित्यपारंगत प्रथम भाग १०; साहित्यस्नातक ३७; साहित्य परिचित ७२; साहित्य-विनीत २२१; मराठी प्रारंभ ९७; आणि मराठी प्रवेश २; याप्रमाणे एकूण २३ केंद्रांत ४३९ परीक्षार्थी परीक्षेत वसले होते.

प्रस्तुत सत्रांत **साहित्य विनीत परीक्षेंत** प्रथम श्रेणींत प्रथम आल्यावद्दल सौ. सुमंगला सरमुकद्दम, अचलपूर यांना कै. प्रा. ना. कृ. दिवाणजी पारितोषिक देण्यांत येत आहे.

विदर्भ साहित्य संघ,
उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर
दि. १५-११-५७

रा. पु. सगदेव,
संचालक,
परीक्षा समिति, वि. सा. संघ

साहित्य पारंगत (उपान्त्य) परीक्षेचा निकाल

सप्टेंबर १९५७ च्या सत्रांत वि. सा. संघातर्फे घेण्यांत आलेल्या साहित्य पारंगत (उपान्त्य) भाग १ मध्ये खालील विद्यार्थी उत्तीर्ण झालेत.

(१) सौ. लीला डाकेफळे, (२) कु. कुसुम खेर, (३) कु. कुसुमावती नावलेकर,
(४) श्री. श. दा. महाजन, (५) श्री. गो. वि. साने.

साहित्य पारंगत-(अन्त्य) भाग २ जानेवारी १९५८ मध्ये सुरू होईल. यासाठी आवेदनपत्र भरण्याची शेवटची तारीख १ डिसेंबर १९५७ ही राहील. यानंतर भरण्यांत येणाऱ्या आवेदनपत्रांना जादा आकार पडेल. तरी विद्यार्थ्यांनी आणि केंद्राधिकाऱ्यांनी ही सूचना अवश्य लक्षांत घ्यावी, ही विनंती.

साहित्य स्नातक (बी. ए. समकक्ष)

साहित्य स्नातक परीक्षेस एकूण **३७** परीक्षार्थी वसले. पैकी **२३** परीक्षार्थी उत्तीर्ण झाले.

क्र.	नांव	श्रेणी
१	व. रा. उमरतकर	३
४	रा. पां. वाईकर	३
६	के. न. खोडे	३
७	म. श्रा. दातीर	३
८	पु. गो. राऊत	३
९	वि. श्रा. कांवळे	३
१०	या. वि. बारापात्रे	३
१५	वि. गं. पाठक	३
१६	ना. गो. खडसे	३
१७	भा. चं. पोफळे	३
१८	रा. तु. वोंडे	३
१९	वि. लो. पाटील	३
२०	वि. स्व. सक्सेना	३
२१	ज्ञा. के. इंगळे	३
२२	ज्ञा. भि. नारखेडे	३
२४	कु. सिन्धू फडणीस	३
२५	कु. वकुल मो. पारधी	३
२७	कु. विद्या भगाडे	३
२८	कु. मंदाकिनी झाडगांवकर	३
२९	र. ह. ब्राम्हणकर	३
३४	प्र. धों. पाठक	३
३५	वि. शं. आर्वीकर	३
३६	न. ल. साखरकर	३

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्य परिचित (इंटर समकक्ष)

या परीक्षेस एकूण ७२ परीक्षार्थी बसले. यांपैकी ४३ परीक्षार्थी उत्तीर्ण झाले. दुसऱ्या वर्गांत ८ आणि तिसऱ्या वर्गात ३५ असे एकंदर ४३ परीक्षार्थी उत्तीर्ण.

क्र.	नांव	श्रेणी
	गुणानुक्रमें	
१	कु. मंदाकिनी गोखले, नागपूर	२
२	कु. पुष्पा वा. चौधरी	२
३	{ कु. कमल ग. जोशी, अमरावती	२
	कु. कमल धों. उगलवार, वर्धा }	२
४	कु. विमल ना. घडे, वर्धा	२
५	श्री. वि. व्यं. टोकेकर, नागपूर	२
२	कु. प्रभा शा. लोकरे.	३
३	कु. मालति दि. जोशी	२
४	कु. सुमन रा. टोम्पे	३
६	पं. वि. कडू	३
८	चं. ग. वोधनकर	३
१०	त्र्यं. मा. पाचघरे	३
१३	शा. रो. श्रोते	३
१४	म. वु. करडे	३
१५	कु. विमल मा. गावंडे	३
१६	चं. वा. कुवडे	३
१७	प. ल. दाणी	२
१८	रा. गो. ढगे	३
२०	वा. गो. मेश्राम	३
२१	भु. मु. बगडे	३
२२	प्र. वा. मुक्तिकांत	३
२५	कु. विमल ना. घडे	२
२६	कु. विमल धों. उगलवार	२
२७	ग. बा. दखने	३
२८	पां. बा. मोहरील	३
३०	जु. ह. धिरण	३
३२	प्र. नि. वोंडे	३
३४	कमल ग. जोशी	२
३५	पु. दे. पाठक	३
३६	रा. उ. खोकले	३
३७	रा. वा. खोडे	३
३८	सा. रू. कडू	३
४०	श्रीमति सुधाताई मा. जोशी	३
४५	कु. उषा वि. साठे	३
४६	कु. कमल शं. तरटे	३
४७	कु. पुष्पा वा. चौधरी	२
४८	कु. मंदाकिनी गोखले	२
५०	कु. इंदुमती कुळकर्णी	३
५१	कु. कमल वंगाले	३
५४	म. वि. देवरणकर	३
५८	वा. के. अत्रे	३
५९	न. श्री. सोमण	३
६१	कु. सुधा द. देशपांडे	३
६२	कु. शैलजा गो. हुद्दार	३
६३	कु. निर्मला ज. हरदास	३
६८	रा. ज. गहलोद	३
६९	वि. व्यं. टोकेकर	२
७०	प्र. ना. श्रावणे	३
७१	कु. रजनी गो. आवदे	३

साहित्य विनीत (मॅट्रिक समकक्ष) परीक्षेचा निकाल

सप्टेंबर १९५७ मध्ये झालेल्या वरील परीक्षेस एकूण २२१ परीक्षार्थी बसले. त्यांपैकी प्रथम श्रेणींत १, द्वितीय श्रेणींत १६, तृतीय श्रेणींत १०१, उत्तीर्ण झाले. या परीक्षेंत सौ. सुमंगला सरमुकद्दम, अचलपूर, यांना प्रथम श्रेणींत प्रथम आल्यावद्दल कै. प्रा. ना. कृ. दिवाणजी पारितोषिक देण्यांत येत आहे.

क्र.	नांव	श्रेणी
	गुणानुक्रमें	
१	सौ. सुमंगला सरमुकद्दम, अचलपूर (कै. प्रा. ना. कृ. दिवाणजी पारितोषिक)	१
२	श्री वि. का. गोडवोले, यवतमाळ	२
३	{ म. ना. सुरोशे, अचलपूर	२
	कु. कांति आपटे, नागपूर }	२
४	श्री. श्री. स. महाजन, मोहपा	२
५	श्री. म. रं. जोशी. नागपूर	५
१	श्री. गुं. मु. हिंगवे	३
२	द. कृ. दुचक्के	३
५	न. के. दुरूखे	३
७	वे. मा. हेडाऊ	३
८	वा. गा. घाटोडे	३
१०	भ. कृ. गाडवे	३
११	भा. म. कामड	१
१२	भा. न. धामोडे	३
१३	शा. ग. हेडावू	३
१४	शे. घ. माटे	३
१५	स. शं. वरखडे	२
१६	सु. वा. चौधरी	३
१८	कु. सुशिला मा. कोरमकर	३
२४	कु. उषालता रा. गुहे	३
२८	दा. मु. निमसरकार	३
२९	ध. क. परशराम	३

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

क्र.	नांव	श्रेणी
३१	ज. तु. पळवेकर	३
३२	ना. र. मिश्र	३
३४	रा. रा. सरमोकदम	३
३६	रा. लु. शेरकी	३
३८	शा. रा. पिपराडे	३
३९	ता. वि. मोदी	३
४०	कु. रंजनी कृ. फडणीस	३
४१	श्री. स. ठेंग	३
४२	शं. गो. वारे	३
४३	ना. जा. दांडगे	३
४६	कृ. ल. दांडगे	३
४७	त्र्यं. स. आघाव	३
४८	भि. मा. धंदर	३
४९	अ. मा. वैराळकर	३
५०	ह. गु. उवरहंडे	३
५१	ते. ग. चव्हाण	३
५२	वा. ना. खरात	३
६१	म. ना. रत्नपारखी	३
६२	प. हि. आंबेकर	३
६३	सा. ग्या. काळे	३
६४	रू. ना. आजवे	३
६५	कि. वि. आखाडे	३
६७	वा. स. त्रिकाळ	३
६८	भा. दौ. देशमुख	३
७०	ना. रा. बाजड	२
७१	तु. स. वानखेडे	२
७२	ना. का. मोरे	३
७३	सि. फ. वोरकर	३
७५	ना. सु. आखाडे	३
७६	ना. गु. पिंपरकर	३
७७	द. न. आखाडे	३
७८	ना. दौ. शेवाळे	३
७९	न. तु. महाकाळे	३
८०	भा. आ. चव्हाण	३
८१	ज्ञा. तु. खोडके	३

क्र.	नांव	श्रेणी
८३	के. स. काळदाते	३
८६	वि. ना. देशमुख	३
८८	वा. नि. भारती	३
९७	सौ. सुमंगला सरमुकद्दम	१
९८	र. आ. कुळकर्णी	२
९९	ज. रा. मिश्र	२
१००	म. ना. सुरोशे	२
१०१	द. सु. पांढरे	२
१०२	कों. चि. अंबाडकर	३
१०३	श्री. स. महाजन	२
१०४	भ. पां. शेवतकार	३
१०५	श. शं. देशमुख	३
१०६	व. भि. रायपुरे	३
१०८	अ. ल. मुंडे	३
११०	ज. म. ठकरार	३
११२	व. का. गोडबोले	२
११३	पां. वि. वानखडे	३
११६	म. रं. भोपळे	३
११८	पी. एम्. मेशराम	३
१२१	भै. शि. मानकर	३
१२४	रा. गो. उज्जनकर	३
१३३	श. ग. कुळकर्णी	३
१३४	गो. सु. महाजन	३
१३७	सं. तो. खाडे	३
१३८	कु. गीताराणी हि. सिद्धांत	३
१३९	श्रीमति तारामती मु. कुळकर्णी	३
१४१	सौ. इंदुमति दे. विजापूरकर	३
१४२	सौ. विमल गो. नाफडे	३
१४३	सौ. शकुंतला गं. होले	३
१४४	कु. शकुंतला पां. नेरकर	३
१४५	कु. शांता स. वखरे	३
१४६	कु. उषा पां. चतूर	३
१४७	कु. सुलभा वि. प्रधान	३

क्र.	नांव	श्रेणी
१४९	उ. शि. गोरडे	३
१५२	वा. के. महालक्ष्मे	२
१५३	वा. ग. खवले	३
१५६	ना. मा. मुळे	३
१५७	अ. मा. जोशी	३
१६५	म. डो. वासनिक	३
१७६	शे. ना. कडू	३
१७७	ना. तु. पटले	३
१८०	ह. मो. नंदेश्वर	३
१८३	प्र. डी. कवरती	३
१८६	श्रीमति सुशिलाबाई मराठे	३
१८७	कु. अरुणा अत्रे	३
१८८	कु. कान्ति आपटे	२
१९०	वि. अ. महाजन	३
१९१	म. रं. जोशी	२
१९२	ह. ज. शेटके	३
१९३	म. तु. वंजारी	३
१९४	अ. भि. पारगांवकर	२
१९६	व. ना. कुळकर्णी	३
२२०	कु. शांता सी. साखरे	३
२२१	कु. इन्दुवाला मंगरूळकर	३
१९७	मु. रा. डवीर	३
१९९	अ. र. लखोटे	३
२००	कु. कला दे. आठले	३
२०२	कु. कुसुम रा. मुरे	३
२०४	कु. संजीवनी शं. देशमुख	३
२०६	घ. उ. मलेवार	३
२०८	रा. उ. समरीत	३
२०९	रा. ब. साकुरे	३
२१०	वि. कृ. मोटघरे	३
२११	शं. फ. आगाशे	३
२१२	ह. सा. वडवाईक	२
२१५	कु. सुलभा शे. देशपांडे	३
२१६	सु. फ. शिवनकार	२

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठी प्रारंभ परीक्षेचा निकाल

सप्टेंबर ५७ मध्ये झालेल्या वरील परीक्षेस एकूण ९७ परीक्षार्थी बसले. त्यांपैकी द्वितीय श्रेणींत ६ आणि तृतीय श्रेणींत ६२ उत्तीर्ण झाले.

क्र.	नांव	श्रेणी
२	वा. वि. जिचकार	३
४	ह. ज. देशमुख	३
५	कु. उषा नी. गायकवाड	३
६	कु. शशिकला चि. शेंडे	२
७	कु. वृन्दा गो. काणे	२
८	कु. मालू गो. सतरंगपते	३
९	कु. सावित्री वि. पिदूरकार	३
१०	कु. सिंधू मा. दोरखंडे	३
११	गो. गो. धामापूरकर	३
१२	चं. मा. देशपांडे	३
१३	अ. वा. हूड	२
१४	भा. बा. वणकर	३
१५	उ. र. समर्थ	३
१६	दौ. फा. वाव्हळ	३
१८	श्री. वि. सूर्वे	३
१९	श्री. रा. वाघमारे	३
२०	वं. घ. कावरा	३
२१	आ. ए. इंगळे	३
२४	कु. इंदू ल. वानखेडे	३
२५	कु. चिंधी वि. महाजन	३
२७	गो. ह. कातडे	३
२८	शि. तु. देशमुख	३
३०	मो. शा. पोटे	३
३१	ना. श्रा. मुळे	३
३४	कु. आशा व. तारे	३
३५	कु. कमल प. बऱ्हाणपुरे	३
३८	प्र. दि. देशपांडे	३
४०	म. भि. संचेती	३
४२	श. वि. देसाई	३
४४	सौ. मंगला मु. धामणगावकर	३
४५	स. ग. वैरागडे	३
४६	वि. पां. कोहाड	३
४७	ज. गो. देशपांडे	३
४८	जि. कृ. सावरकर	२
४९	न. ग. नानोटकर	३
५०	अ. भा. रानडे	३
५१	ह. कृ. जगदळे	३
५३	पु. वा. मूरतकार	३
५४	कु. सिस्टर केव्हिन	३
५५	कु. सिस्टर मारी वर्टील	३
५६	कु. सिस्टर मारी लिओनी	३
५७	म. शा. टाले	३
५८	रा. न. इंगळे	२
५९	वि. ल. मानेकर	३
६०	वि. रं. इंगळे	३
६१	श. म. देशमुख	२
६२	स. वि. येते	३
६५	इक्बाल अहमद अन्सारी	३
६६	म. हृ. भोराडे	३
६७	रा. कि. पानसे	३
७१	कृ. मा. डोये	३
७२	न. पो. वंडावार	३
७३	व. ग. बंडावार	३
७४	दे. द. वऱ्हाडे	३
७५	म. ल. शेंडे	३
८०	ग. आ. माविडनम्	३
८२	श्री. चां. मिरे	३
८४	सैफुद्दीन जाफरभाई पंजवानी	३
८५	मेहदी अ. जाफरभाई घम्माणी	३
८६	म. त्र्यं. संत	३
८७	सु. म. पाडिया	३
८८	अ. ग. वेंद्रे	३
८९	वे. स. पन्हाळकर	३
९०	स. शा. रेळे	३
९१	न. अ. पठाण	३
९५	ओ. रा. गोयनका	३
९६	व्र. कि. रोठे	३
९७	वि. रा. गोमासे	३

मराठी–प्रवेश परीक्षेचा निकाल

या परीक्षेत दोन परीक्षार्थी परीक्षेस बसले. दोनहि परीक्षार्थी उत्तीर्ण झाले.

क्र.	नांव	श्रेणी
१	श्री. जहाल अ. जाफर घम्माजी	३
२	श्री. पुं. वा. पांडव	२

माऊजी दप्तरी संदर्भ ग्रंथालय
30329
दाखल नोंद क्रमांक
दिनांक 10.2.98
92

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
अनुक्रमणिका

परीक्षा–समिति–वृत्त

जानेवारी १९५८ मध्यें होणाऱ्या परीक्षांच्या तारखा पुढील प्रमाणें:—
शनिवार दि. १८–१–१९५८; रविवार दि. १९–१–१९५८

१. नव्या केंद्रासाठी सूचना:—

वि. सा. संघातर्फे होणाऱ्या परीक्षांचीं नवीं केंद्रें ज्यांना सुरु करावयाचीं असतील त्यांनी त्यासंबंधी दि. १५ डिसेंबर ५७ च्या आंत परीक्षासमितीकडे मागणी करावी.

२. केंद्र व्यवस्थापकांना विनंती:—

केंद्रव्यवस्थापकांनी जानेवारी ५८ मध्ये होणाऱ्या परीक्षांना किती परीक्षार्थी बसतील याचा अंदाज कळवून त्याप्रमाणें सर्व परीक्षा साहित्य मागविण्याची कृपा करावी. १५ डिसेंबरच्या आंत नवीन आवेदनपत्रें भरून पाठवावीत. ऑगस्ट ५७ च्या सत्रापासून वाढलेल्या शुल्काप्रमाणें आवेदनपत्रें भरून घ्यावींत. सुविधा पद्धति बंद हेंहि लक्षांत घ्यावे.

३. साहित्य पारंगत परीक्षा

साहित्य पारंगत परिक्षेचें माहितीपत्रक ज्यांना पाहिजे असेल त्यांनी ५६ नव्या पैशांचें पोस्टेज पाठवून मागणी करावी. उपान्त्य आणि अन्त्य असे पारंगत परीक्षेचे दोन भाग करण्यांत आले आहेत, हें लक्षांत घ्यावें.

४. परीक्षार्थी व केंद्राधिकारी यांना सूचना:—

पोस्टाचे दर वाढले आहेत. पत्रें किंवा कांही परीक्षेसंबंधीं साहित्य आमचेकडे पाठविण्याचें झाल्यास पोस्टाचीं पुरेशीं तिकिटें लावण्याची परीक्षार्थींनी आणि केंद्राधिकाऱ्यांनी काळजी घ्यावी. **परीक्षार्थ्यांनी** प्रश्नपत्र आणि माहितीपत्रकाकरिता पुरेसें पोस्टेज पाठविण्याचें करावें.

टीप:—नव्या बदललेल्यां अभ्यासक्रमानुसार साहित्यविनीत परीक्षा प्रश्नपत्र १ गद्य—यामध्ये संक्षिप्त उषःकाल **अथवा** क्रांति (साने गुरुजी) आणि साहित्य परिचित परीक्षा प्रश्नपत्र १ गद्य—यामध्ये इंदू काळे, सरला भोळे **अथवा** संक्षिप्त धावता धोटा (वरेरकर) असा बदल सर्वांनी लक्षांत घ्यावा.

वि. सा. संघ
नागपूर, दि. ३०–११–५७

रा. पु. सगदेव,
संचालक, परीक्षा समिति, वि. सा. संघ

भाऊजी दफ्तरी स्मृती
संदर्भ ग्रंथालय

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे उद्देश आणि गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण करणें व नाट्यगृह बांधणें.

२ वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने दुर्मिळ ऐतिहासिक, शैक्षणिक व वाङ्मयीन ग्रंथांचें प्रकाशन

५. मराठी भाषेच्या हिताचें प्रातिनिधिक स्वरूपाचें कार्य करणें.

मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने विदर्भ साहित्य संघाला मदत करावी अशी नम्र विनंती आहे.

'युगवाणी' सदस्यांना विनामूल्य. ✱ सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कै. कोल्हटकर स्मारक नाट्यमंदिर, खामगाव

जाहीर विनंती



साहित्य सम्राट कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचा जन्म नागपूरचा, परंतु वास्तव्य खामगांवला आणि कीर्ति महाराष्ट्रभर होती. मराठी वाङ्मयांतील त्यांचें स्थान अजरामर आहे. तेव्हा खामगांव ह्या त्यांच्या वास्तव्याच्या गावीं नाट्यमंदिराच्या रूपाने त्यांचें योग्य स्मारक उभारावें हें काम विदर्भ साहित्य संघाच्या खामगांव शाखेने हातीं घेतलें आहे. स्मारकाचें बरेचसें काम पूर्ण झालें आहे. तथापि रंगमंचाचें काम अजून व्हावयाचें आहे व त्याकरितां अदमासें सात–आठ हजार रुपये खर्च येणार आहे. तरी कै. कोल्हटकरांचे संबंधी व चहाते, मराठी साहित्याचे प्रेमिक व नाट्यलोलुप रसिक यांनी सढळ हाताने आर्थिक मदत करून अखिल महाराष्ट्रांत गाजलेल्या ह्या अग्रगण्य नाटककाराचें स्मारक उभारण्याचें श्रेय संपादन करावें, अशी त्यांना नम्र विनंती आहे.

साहाय्य पाठविण्याचा पत्ता––

१ श्री. वि. ए. तारे,
गो० से० महाविद्यालय, खामगांव
किंवा
२ श्री. सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर

हें मासिक श्री. **पुरुषोत्तम दिवाकर ढवळे,** यांनी वि. सा. संघाकरितां नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ–कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ